नागपुर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

www.dainikmahasagar.in / Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com

* वर्ष ५१ * अंक २७६ * * अकोला * बुधवार, दिनांक २ एप्रिल २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.)

संपर्क
संपादकीय : 9922970023; वितरण : 8888647753
जाहिरात : 7447735851 / 9326906062
नागपूर कार्यालय संपर्क : 7447735851
नागपूर मुख्य कार्यालय : कॉटन मार्केट, नागपूर – 440018

महासागर | NAGPUR POST
महासागर व NAGPUR POST ची जोडी, वाचतांना येईल वाचनाची गोडी
महासागर (मराठी) आणि NAGPUR POST (English)
घरपोच पाठविण्याची सुविधा.
महासागर किंमत Rs. 3
Nagpur Post Rs. 3 = 6
4 रुपयात

## दोन मालगाड्यांची धडक, दोन ठार

■ **वृत्तसंस्था, साहिबगंज, दि. १ :**
झारखंडमधील साहिबगंज येथे दोन मालगाड्यांमध्ये समोरासमोर टक्कर झाली आहे. सोमवारी रात्री ३ वाजता हा अपघात झाला. या अपघातात दोन लोको पायलटचा मृत्यू झाला आहे. त्याच वेळी, सुरक्षेत गुंतलेले चार सीआयएसएफ जवान जखमी झाले आहेत.
एक मालगाडी रुळावर उभी होती. दरम्यान, त्याच ट्रॅकवर दुसरी मालगाडी आली. यामुळे दोन्ही गाड्या समोरासमोर धडकल्या. अपघातात मृत्युमुखी पडलेल्या दोन लोको पायलटपैकी अंबुज महातो हे बोकारोचे रहिवासी होते. तर बीएस मॉल बंगालचे रहिवासे होते. जखमींवर बरहात सदर रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

अग्राग्रलेख

**खरीखरी..**

## बुलडोझरी वास्तव

आजच सर्वोच्च न्यायालयाने बुलडोझरच्या कारवाईबाबत प्रचंड नाराजी व्यक्त केली. सरकारने कोर्टाचे अधिकार आपल्या हाती घेऊ नयेत. अशी स्पष्ट आणि दमदार तंबी सर्वोच्च न्यायालयाने दिलेली आहे. ही बाब उत्तर प्रदेश सरकारमधील असली. तरी ती सर्वांनाच लागू होते. दबक्या आवाजात का होईना सर्वोच्च न्यायालयाने आपले अधिकारावर जे अतिक्रमण झाले आहे. ते सहन केले जाणार नाहीत. हे ही सांगितलेले आहे. ज्यांच्यावर बुलडोझर चालवला आहे. त्यांनी गुन्हा केलाच आहे. असे गृहीत धरून सरकार कारवाई करते. कुठे जागेवर अतिक्रमण आहे, कुठे अवैध बांधकामावर अतिक्रमण आहे. कुठे बळजबरीने घेतलेला ताबा आहे. अशा वेगवेगळ्या कारणांमुळे ही बुलडोझरी कारवाई करण्यात आलेली आहे. थोडक्यात जे अधिकार न्यायालयाकडे आहेत. ते वेगवेगळे नियम दाखवून सरकारने सारी कारवाया करण्याची शक्ती आपल्या ताब्यात घेणे. याबद्दल सर्वोच्च न्यायालयाला चीड आलेली आहे. पण असे का होते, याचा विचारही न्यायालयानेच केला पाहिजे. एखादे प्रकरण न्यायालयात दाखल झाले की, त्याचा निकाल जेव्हा लागायचा तेव्हाच लागतो. पण तोपर्यंत जो कोणी न्याय मिळवण्यासाठी न्यायालयात जातो. त्याचाच तोपर्यंत निकाल लागलेला असतो. हे सत्य आहे. अलीकडचेच सांगायचे झाले. तर परवा नागपुरात एका माणसाने चार-पाच वर्षांपूर्वी ज्या व्यक्तीने त्याच्या मुलाचा खून केला होता. त्याला अगदी भर रस्त्यात सपासप वार करून संपवून टाकले. एका बापाचा हा राग स्पष्टपणे न्यायालयाच्या मर्यादा किती आणि कशा आहेत हे सिद्ध करणारा आहे. नुकताच सुशांतसिंग राजपूत याच्या प्रकरणात रिया चक्रवर्तीवर किती घणाघाती आरोप झाले आणि ते आरोप चघळून चघळून करणारे अर्णव गोस्वामी सारखे बालिश पत्रकार चक्क उघडे पडले. काही दिवस वृत्तवाहिन्यांवर रिया चक्रवर्ती कशी खलनायक आहे. हे बेंबीच्या देठापासून बोंबलणाऱ्या पत्रकारांवर न्यायालयाने चांगलीच चपराक लगावलेली आहे. न्यायालयाने आता रिया चक्रवर्तीला निर्दोष ठरवले आहे. पण तिच्या ऐन उमेदीच्या काळात जे जे आरोप केले होते. ते फोल ठरल्यावर एकातरी वृत्तवाहिनीवर त्याच न्यायालयाने दोषारोप केला आहे काय. आता ती बिचारी निर्दोष सुटली आहे. तरी तिला निर्दोष असतानाही जेलमध्ये जावे लागले. समाजात बदनामी झाली. तिच्या आयुष्याचे सर्व गणितच बिघडले. याला जबाबदार कोण. अशा स्थितीत रिया चक्रवर्तीच्या या साडेपाच वर्षांची भरपाई कशी होणार. या ठिकाणी बुलडोझरी न्याय वापरला असता. तर रियाला पुन्हा बदनामी झेलावी लागली असती. थोडक्यात आपली न्यायालये कोणत्याही प्रकरणात चघळून चघळून आणि प्रचंड विलंब लावून जो काही न्याय देतात. तो त्यांना तेव्हा मिळतो. जेव्हा त्याची चवच गेलेली असते. आम्हाला एक म्हणायचे आहे. ते हे की न्यायालयात जी जी प्रकरणे समोर असतील. त्या त्या प्रकरणाचा निकाल जलद गतीने करणे गरजेचे आहे. तसे झाले तर, कुणालाही बुलडोझर चालवण्याची गरजच पडणार नाही. आता ज्या ज्या प्रकरणात सरकारने कारवाई केली. त्याचा इतिहास बघितला तर असे दिसते की, सरकारला न्यायालयीन निर्णय वेळेत होणार नाही. याची खात्री असल्यामुळेच असे निर्णय घ्यावे लागले असावेत. म्हणजे न्यायालयाने दिलेल्या निकालाची ही सुद्धा एक बाजूच आहे असे आपण का ठरवू नये. एका दृष्टीने पाहिले तर हिंदुहृदय सम्राट होऊ पाहणाऱ्या योगीजींना असे निर्णय घेतल्याबद्दल अनेकांनी शाबासकी दिलेलीच आहे. आता न्यायालयाने त्यांच्या आदेशानुसार नुकसान भरपाई दिली. तरी 'जो बूंद से गई, वो हौद से नही आती' या सूत्राप्रमाणे एका दिवसात झालेली गोष्ट पुन्हा उभी राहू शकत नाही. मुळातच भरपाई आणि बुलडोझर यांचा बादरायण संबंध जोडला जाऊ शकत नाही. यामध्ये एक गोष्ट मात्र नक्की आहे. ती म्हणजे अशा जबरदस्त कारवाईमुळे उत्तर प्रदेशातील नामचीन गुंड जे सर्व आपली गुंडाई, गुंडगिरी रागवीत होते त्यासोबतच अगदी उजळ माथ्याने गुंडपणा करीत होते. ते पार बरबाद झालेले आहेत. न्यायालयाने एखाद्या प्रकरणात ताशेरे झाडले असतील तरी हरकत नाही. तरी यापुढे असे होणारच नाही. याची खात्री कोणतेही सरकार देणार नाही. ही आम्हाला खात्री आहे. म्हणजेच न्यायालयाच्या विलंबामुळे ज्याच्यावर अन्याय होतो. त्याच्यावरचा अन्याय कधीच पूर्णपणे दूर होत नाही. हे यामधले खरे वास्तव आहे.

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

# ई-बाइक टॅक्सीला राज्यात परवानगी

### राज्य मंत्रिमंडळाचा मोठा निर्णय; सरकारच्या वतीने दहा हजार रुपये अनुदान

■ **महासागर प्रतिनिधी मुंबई, दि. १ :**
राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत बाइक टॅक्सीला परवानगी देण्यात आली असून राज्यात केवळ ई-बाइक टॅक्सीला परवानगी असणार आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.
सह्याद्री अतिथीगृहात झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीमध्ये हा निर्णय घेण्यात आला. ई-बाइक टॅक्सीसाठी राज्य सरकारच्या वतीने दहा हजार रुपये अनुदान देखील देण्यात येणार आहे. तसेच कमीत कमी खर्चात प्रवाशांना सुख सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याचे सरनाईक यांनी सांगितले. यासोबतच महिलांच्या सुरक्षिततेसाठी विशेष धोरण तयार करण्यात येणार असल्याची माहिती देखील त्यांनी दिली.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत बाइक टॅक्सला मंजुरी देण्यात आली असल्याचा माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली.
कमी खर्चामध्ये चांगला प्रवास करता यावा यासाठी हा निर्णय घेण्यात आला असल्याचेही त्यांनी सांगितले. मात्र यामध्ये पेट्रोल बाइकला परवानगी देण्यात येणार नाही. तर केवळ इलेक्ट्रिक बाइकला परवानगी दिली जाणार असल्याचे प्रताप सरनाईक यांना प्रसार माध्यमांना सांगितले.





**रिक्षा आणि टॅक्सी चालकांना दहा हजार रुपये अनुदान देण्याचा प्रस्ताव**
या ई-बाइक टॅक्सीमध्ये प्रवाशांच्या सुरक्षेला प्राधान्य दिले जाणार असल्याचेही प्रताप सरनाईक माध्यमांशी बोलताना म्हणाले. इलेक्ट्रिक बाइकला प्रोत्साहन देण्यासाठी हा निर्णय घेण्यात आल्याचे सरनाईक यांनी म्हटले आहे. इतकेच नाही तर रिक्षा आणि टॅक्सी चालकांना दहा हजार रुपये अनुदान देण्याचा आमचा प्रयत्न आहे. या माध्यमातून दहा हजारांपेक्षा अधिक रोजगार निर्मिती मुंबईत तर वीस हजार पेक्षा जास्त रोजगार निर्मिती ही महाराष्ट्रात होइल, असा विश्वास देखील प्रताप सरनाईक यांनी व्यक्त केला.

## फटाका कारखान्यात स्फोट
## १८ कामगार ठार



■ **वृत्तसंस्था, अहमदाबाद, दि. १ :**
गुजरातच्या बनासकांठा येथील फटाक्याच्या कारखान्यात बॉयलरच्या स्फोटात १८ कामगारांचा मृत्यू झाला तर ३ जण गंभीर जखमी झाले. हा कारखाना डीसा येथील धुनवा रोडवर आहे.
बॉयलरच्या स्फोटामुळे फटाक्यांच्या कारखान्यात आग लागली. कारखान्यात काम करणारे कामगार त्यात अडकले. आतापर्यंत सात कामगारांचे मृतदेह सापडले आहेत. मृतांचा आकडा आणखी वाढू शकतो. दीपक ट्रेडर्स नावाचा हा फटाका कारखाना खुबचंद सिंधी यांचा आहे. तो या कारखान्यात स्फोटके आणायचा आणि फटाके बनवायचा. तथापि, कंपनी मालकाकडे फक्त फटाके विकण्याचा परवाना आहे, ते तयार करण्याचा नाही . दीसाचे आमदार प्रवीण माळी म्हणाले की, कारखान्याच्या ढिगाऱ्याखाली अजूनही कामगार गाडले गेले आहेत. तथापि, पाच जणांना वाचवण्यात आले आहे आणि त्यांना रुग्णालयात नेण्यात आले आहे. ज्यांच्यावर उपचार सुरू आहेत.
स्फोट झाला तेव्हा कामगार कारखान्यात काम करत होते. अचानक झालेल्या स्फोटामुळे त्यांना पळून जाण्याची संधीही मिळाली नाही. स्फोट इतका भीषण होता की अनेक कामगारांच्या शरीराचे अवयव दूरवर विखुरले गेले. कारखान्याच्या मागे असलेल्या शेतात काही मानवी अवयवही सापडले आहेत.

## सिलिंडर स्फोटात ७ ठार

■ **वृत्तसंस्था, कोलकाता, दि. १ :**
पश्चिम बंगालमधील दक्षिण २४ परगणा जिल्ह्यातील पाथर प्रतिमा परिसरात सोमवारी रात्री गॅस सिलिंडरच्या स्फोटात सात जणांचा मृत्यू झाला. मृतांमध्ये ४ मुले आणि २ महिलांचा समावेश आहे. एका जखमी महिलेला उपचारासाठी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.
हा अपघात रात्री ९ वाजताच्या सुमारास पाथर प्रतिमा ब्लॉकमधील ढोलाघाट गावात झाला. मृत्युमुखी पडलेले लोक एकाच कुटुंबातील आहेत. दोन गॅस सिलिंडरमध्ये स्फोट झाला होता, ज्यामुळे घरात ठेवलेले फटाके जळाले आणि आग वेगाने पसरली. या घटनेत ७ जणांचा मृत्यू झाला. घरात फटाके बनवण्याचा काही बेकायदेशीर व्यवसाय सुरू होता का, याचा तपास पोलिस करत आहेत.
ज्या घरात अपघात झाला त्या घरात अनेक वर्षांपासून फटाके बनवले जात होते. सोमवारी संध्याकाळी एक मोठा स्फोट झाला आणि त्यानंतर आग लागली. बनिक कुटुंबात एकूण ११ सदस्य राहत होते. त्यापैकी ४ जण अजूनही बेपत्ता आहेत.

## आपल्याच नेत्यांवर सरकार 'मेहरबान'

### भाजप नेत्यांच्या साखर कारखान्यांना ४३६ कोटीचे कर्ज

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**
राज्यातील महायुती सरकारने राष्ट्रीय सहकारी विकास महामंडळ (एनसीडीसी) कडून राज्याच्या जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांच्यासह भाजप कार्यकर्त्यांशी संबंधित दोन सहकारी साखर कारखान्यांना ४३६ कोटी रुपयांच्या कर्जाचा बोझा कमी करण्याचा निर्णय घेतला आहे.
या निर्णयामुळे राज्याच्या दायित्वात भर पडेल, कारण राज्य आधीच ९.३ लाख कोटी रुपयांच्या सर्वाधिक कर्जाचा सामना करत आहे. एनसीडीसी कडून कर्ज घेण्यासाठी राज्याची हमी आवश्यक आहे. कर्ज परत करण्याचा निर्णय राज्याचे सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांच्या नेतृत्वाखालील मंत्रिमंडळ उपसमितीने घेतला आहे.
या संबंधी झालेल्या बैठकीत, उपसमितीने जलसंपदा मंत्री यांच्याशी संबंधित अहिल्या नगर येथील पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील सहकारी साखर कारखान्याला २९६ कोटी रुपयांचे मार्जिन मनी कर्ज परत करण्याचा निर्णय घेतला असल्याचा दावा एका वृत्तपत्राने केला आहे.

## वक्फ सुधारणा विधेयक आज लोकसभेत सादर होणार




■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १ :**
वक्फ दुरुस्ती विधेयक २ एप्रिल रोजी दुपारी १२ वाजता प्रश्नोत्तराच्या तासानंतर लोकसभेत सादर केले जाईल. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी यावर चर्चेसाठी ८ तासांचा वेळ राखून ठेवला आहे. यानंतर हे विधेयक लोकसभेत मंजूर होईल.
जेव्हा व्यवसाय सल्लागार समितीने ही माहिती दिली तेव्हा विरोधकांनी निश्चित वेळेला विरोध केला आणि १२ तासांची चर्चा करण्याची मागणी केली. संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू म्हणाले की, विधेयकावर चर्चेसाठी वेळ वाढवला जाऊ शकतो. समाजवादी पक्षाचे (सपा) प्रमुख आणि खासदार अखिलेश यादव म्हणाले की, आम्ही या विधेयकाला विरोध करू. दरम्यान, उत्तर प्रदेशचे मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ म्हणाले की, वक्फमधील सुधारणा ही काळाची गरज आहे.
वक्फ दुरुस्ती विधेयकावरून आज लोकसभेतही गदारोळ झाला. प्रश्नोत्तराचा तास संपताच विरोधकांनी घोषणाबाजी सुरू केली. सभापती ओम बिर्ला यांनी सदस्यांना शांतता राखण्याचे आवाहन केले, त्यानंतर कामकाज दुपारी २ वाजेपर्यंत तहकूब करण्यात आले.

## याच महिन्यात भाजपच्या नवीन अध्यक्षाची घोषणा

■ **वृत्तसंस्था, नवी दिल्ली, दि. १ :**
भाजपला या महिन्यात नवीन राष्ट्रीय अध्यक्ष मिळणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नागपूर भेटीनंतर निवडणूक प्रक्रियेला वेग आला आहे.
माहितीनुसार, मोदी आणि आरएसएस प्रमुख मोहन भागवत यांच्यात ३० मार्च रोजी झालेल्या बैठकीत नवीन अध्यक्षाच्या नावावर चर्चा झाली.मोदी नागपूरहून परतल्यानंतर पक्षाच्या वरिष्ठ नेत्यांशीही चर्चा झाली. पंतप्रधानांनी विद्यमान अध्यक्ष जेपी नड्डा, अमित शहा, राजनाथ सिंह आणि संघटना सरचिटणीस बीएल संतोष यांच्याशी राज्यांच्या संघटनात्मक निवडणुकांबाबत चर्चा केली.
पंतप्रधानांनी नड्डा आणि बीएल संतोष यांना या महिन्यातच भाजप अध्यक्षपदाची निवडणूक पूर्ण करण्यास सांगितले आहे. भाजपने आतापर्यंत १३ राज्यांमध्ये प्रदेशाध्यक्षांची निवड केली आहे. राष्ट्रीय अध्यक्ष निवडण्यासाठी १९ राज्यांमध्ये निवडणुका पूर्ण कराव्या लागतात. उत्तर प्रदेश, पश्चिम बंगालसह उर्वरित बहुतेक राज्यांच्या प्रदेशाध्यक्षांची नावे पुढील आठवड्यापर्यंत जाहीर केली जातील.

## कारखान्यातून गॅस गळती मालकासह ३ जणांचा मृत्यू

■ **वृत्तसंस्था, बेवार, दि. १ :**
राजस्थानच्या बेवार येथील एका ॲसिड कारखान्याच्या गोदामात उभ्या असलेल्या टँकरमधून नायट्रोजन वायूची गळती झाल्याने कंपनी मालकासह तिघांचा मृत्यू झाला. दोघांची प्रकृती अजूनही गंभीर आहे.
अपघातात जखमी झालेल्या ६० हून अधिक लोकांना बेवार आणि अजमेरच्या सरकारी रुग्णालयात दाखल करण्यात आले. या वायूच्या परिणामामुळे अनेक पाळीव प्राणी आणि भटक्या कुत्र्यांचाही मृत्यू झाला आहे. बारिया परिसरातील सुनील ट्रेडिंग कंपनीत ही घटना घडली. कारखान्याजवळील अनेक घरे रिकामी करण्यात आली आहेत.
या अपघातात कंपनीचे मालक सुनील सिंघल (४७) यांचा मृत्यू झाला. ते रात्रभर गॅस नियंत्रित करण्याचा प्रयत्न करत होते. त्यांची प्रकृती बिघडल्याने त्यांना अजमेर जेएलएन रुग्णालयात रेफर करण्यात आले. उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला.

## महायुतीचं एप्रिल फूल, आश्वासनांचा डब्बा गुल!



■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**
राज्यातील महायुतीचे सरकार हे एप्रिल फुल्ल सरकार असल्याची टीका उद्धव ठाकरे गटाचे आमदार आदित्य ठाकरे यांनी केली आहे. राज्यातील अनेक योजना बंद होत असून दिलेली आश्वासने एप्रिल फूल ठरत असल्याचेही त्यांनी म्हटले आहे.
कचरा गोळा करणे आणि त्याची विल्हेवाट लावण्याची महापालिकेची यंत्रणा आहे. असे असताना मुंबईकरांना आता कचरा उचलण्याचे पैसे महापालिकेला मोजावे लागणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

## मालगाडी समोर उडी घेत टीसीने संपवले आयुष्य



■ **महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. १ :**
मुर्तिजापूरच्या रेल्वे स्थानकावर तिकीट चेकरने आत्महत्या केल्याची धक्कादायक घटना घडली आहे. मुर्तिजापूर येथून भुसावळच्या दिशेने जाणाऱ्या मालगाडी समोर येत या तिकीट चेकरने आयुष्य संपवले असल्याची माहिती समोर आली आहे. सुमेध मेश्राम असे या आत्महत्या करणाऱ्या तिकीट चेकरचे नाव आहे.
घरगुती तणावातून सुमेध मेश्राम यांनी आत्महत्या केल्याची माहिती समोर येत आहे. तपासतून समोर आलेल्या माहितीनुसार ४० वर्षीय सुमेध मेश्राम हे घरगुती कारणामुळे तणावात होते.

## प्रशांत कोरटकरचा कोठडीतील मुक्काम वाढला

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**
कोल्हापुरातील इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना धमकी दिल्याप्रकरणी आणि छत्रपती शिवाजी महाराज आणि संभाजी महाराज यांच्याबद्दल अवमानकारक विधान केल्याप्रकरणी प्रशांत कोरटकरला अटक करण्यात आली आहे.
दरम्यान ५ दिवसांच्या पोलिस कोठडीनंतर आता कोल्हापूर कोर्टाने प्रशांत कोरटकरला न्यायालयीन कोठडी सुनावलेली आहे. त्यानंतर कोरटकरच्या वकिलांनी जामिनासाठी अर्ज दाखल केला आहे. त्यावर आज न्यायालयात सुनावणी पार पडली. प्रशांत कोरटकरचा जामीन अर्ज कोल्हापूर न्यायालयाने फेटाळला आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल केलेल्या आक्षेपार्ह वक्तव्याप्रकरणी प्रशांत कोरटकरला न्यायालयीन कोठडी सुनावण्यात आली होती.
यानंतर प्रशांत कोरटकरने जामिनासाठी कोल्हापूर न्यायालयाकडे अर्ज केला होता. परंतु, न्यायालयाने त्याचा जामीन अर्ज फेटाळून लावला आहे. प्रशांत कोरटकरला आता आणखी काही दिवस न्यायालयीन कोठडीत राहावे लागेल.

## गडचिरोली जिल्ह्यात खनिकर्म प्राधिकरण स्थापनेस मंजुरी

### रेल्वे मार्गासाठी ९४३ कोटींचा निधी

■ **महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. १ :**
गडचिरोली जिल्ह्यातील खनिज संपत्तीच्या नियोजनबद्ध विकासासाठी आणि औद्योगिक प्रगतीला चालना देण्यासाठी मंत्रिमंडळाच्या बैठकीत महत्त्वपूर्ण निर्णय घेण्यात आले.
मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या बैठकीत गडचिरोली जिल्हा खनिकर्म प्राधिकरण स्थापन करण्यास मंजुरी देण्यात आली. तसेच, वडसा-देसाईगंज-गडचिरोली रेल्वे मार्ग प्रकल्पासाठी राज्याच्या हिश्श्याचे ९४३ कोटी २५ लाख रुपये देण्यासही मान्यता मिळाली.
राज्याची अर्थव्यवस्था एक ट्रिलियन डॉलरपर्यंत नेण्याच्या उद्दिष्टाला गती देण्यासाठी गडचिरोलीत अल्ट्रा मेगा प्रकल्प तसेच सूक्ष्म, लघु आणि मध्यम उद्योगांना चालना देणे आवश्यक आहे. यासाठी खनिज क्षेत्राचा विकास आणि नियमन करण्याच्या हेतूने हे प्राधिकरण स्थापन करण्याचा प्रस्ताव मांडण्यात आला होता, ज्याला मंजुरी मिळाली.
हे प्राधिकरण जिल्ह्यातील प्रमुख आणि औद्योगिकदृष्ट्या महत्त्वाच्या गौण खनिजांचे व्यवस्थापन करेल. प्राधिकरणाच्या निर्णयांची अंमलबजावणी करण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली कार्यकारी समितीही स्थापन करण्यात आली आहे. प्राधिकरणाचे अध्यक्ष मुख्यमंत्री असतील, तर खनिकर्म मंत्री उपाध्यक्ष असतील. यात शासनाने नामनिर्देशित मंत्री, मुख्य सचिवांसह १३ सदस्यांचा समावेश आहे. या प्राधिकरणामुळे गडचिरोलीत खनिज क्षेत्राचा जलद विकास होऊन औद्योगिक प्रगतीला चालना मिळेल.

# राज्यातील नवजात बालिकांना श्री सिद्धिविनायक पावणार

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :**
श्री सिद्धिविनायक मंदिर ट्रस्टतर्फे श्री सिद्धिविनायक भाग्यलक्ष्मी योजना राबवण्यात येत असून याला न्यास या व्यवस्थापन समितीने यास मान्यता दिली आहे.
राज्यातील मुलींच्या जन्मास प्रोत्साहन देणे, त्यांच्या शिक्षणासाठी आर्थिक मदत करणे, मुलीना सक्षम बनवण्यास प्रयत्न करणे या उद्देशांना हातभार लागावा यासाठी श्री सिद्धिविनायक गणपती मंदिरतर्फे नवीन उपक्रम सुरू करण्यात आला आहे.
महाराष्ट्रातील शासकीय रुग्णालयात जन्मास आलेल्या बालिकांच्या नावाने १० हजार रुपयांचे फिक्स्ड डिपॉझिट स्वरूपात त्यांच्या आईच्या बँक खात्यावर ठेवण्याबाबतची योजना प्रस्तावित करण्यात आली आहे. या योजनेला न्यास व्यवस्थापन समितीकडून या अभिनव योजनेला मंजूरी देण्यात आली आहे. तसेच शासनाच्या मान्यतेनंतर योजनेसाठीचे निकष जाहीर कारणयात येतील, अशी माहिती सिद्धिविनायक ट्रस्टकडून देण्यात आली आहे.




**ट्रस्टचे उत्पन्न १३३ कोटींच्या घरात**

श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यासाच्या विश्वस्त समितीची बैठक ३१ मार्च रोजी संस्थेचे अध्यक्ष सदानंद सरवणकर यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली. श्रीसिध्दिविनायक गणपती मंदिर न्यासाचा सन २०२४-२५ चे वार्षिक विवरणपत्र तसेच सन २०२५-२६ चे अर्थसंकल्पिय अंदाजपत्रक या बैठकीत सादर करण्यात आले.
२०२४-२०२५ या वर्षात न्यासाचे उत्पन्न ११४ कोटी इतके अपेक्षित होते ते विक्रमी १३३ कोटींच्या घरात गेले आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत ही जवळपास १५ टक्के वाढ आहे. आता पुढील उत्पन्न हे १५४ कोटी इतके गृहीत धरण्यात आले आहे.
संस्थेच्या अर्थसंकल्पात महाराष्ट्रातील शासकीय रुग्णालयात जागतिक महिला दिनी ८ मार्च रोजी जन्म झालेल्या नवजात बालिकांच्या सर्वांगीण विकासासाठी श्री सिद्धिविनायक भाग्यलक्ष्मी योजना राबवण्याचा प्रस्ताव शासन मान्यतेवर सादर करण्याबाबतची घोषणा अध्यक्ष सदानंद सरवणकर यांच्या उपस्थितीत कारणयात आली.

# कोरटकर फरार असताना त्याला सरकारी व्यक्ती भेटले

### आ. रोहित पवार यांचा मोठा दावा



■ **मुंबई :** इंद्रजित सावंत यांना धमकी दिल्या प्रकरणात न्यायालयीन कोठडीत असलेल्या प्रशांत कोरटकरच्या जामीन अर्जावर आज सुनावणी आहे. मात्र, त्या आधीच राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे आमदार रोहित पवार यांनी कोरटकर प्रकरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित केले आहे. कोरटकर फरार असताना त्याला कोण सरकारी व्यक्ती भेटला हे जाहीर करण्याची हिंमत सरकारमध्ये आहे का? असा प्रश्न त्यांनी विचारला आहे.

कोल्हापुरातील इतिहास अभ्यासक इंद्रजीत सावंत यांना धमकी दिल्याप्रकरणी आणि छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांच्याबद्दल अवमानकारक विधान केल्याप्रकरणी प्रशांत कोरटकरला अटक करण्यात आली आहे. दरम्यान ५ दिवसांच्या पोलिस कोठडीनंतर आता कोल्हापूर कोर्टाने प्रशांत कोरटकरला न्यायालयीन कोठडी सुनावलेली आहे. त्यानंतर कोरटकरच्या वकिलांनी जामिनासाठी अर्ज दाखल केला आहे. त्यावर आज न्यायालयात सुनावणी सुरु आहे. मात्र त्याच वेळी आमदार रोहित पवार यांनी कोरटकर प्रकणावरुन अनेक प्रश्न उपस्थित केले आहेत.

आमदार रोहित पवार यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, तेलंगणामध्ये पसार होण्यापूर्वी चिल्लर कोरटकर हा चंद्रपूर पोलीस मुख्यालयासमोरील सिद्धार्थ हॉटेल मध्ये मुक्कामी थांबला होता. त्यादरम्यान त्याला अनेक मोठ्या सरकारी व्यक्ती भेटल्याची माहिती आहे. कोरटकरला कोण कोण भेटले, कोणी कोणाचा काय निरोप दिला हे जाहीर करण्याची सरकारमध्ये हिम्मत आहे का? असल्यास सीसीटीव्ही फुटेज तपासून डिटेल्स जाहीर करावेत.

## मोदींच्या मंत्र्यांचे अमेरिकेसमोर लोटांगण

### पृथ्वीराज चव्हाण यांचा आरोप



**मुंबई :** महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री पृथ्वीराज चव्हाण यांनी अमेरिकेच्या आयात शुल्क निर्णयांचा भारतीय शेतक?यांवर, विशेषतः महाराष्ट्रातील शेतक?यांवर होणा?या संभाव्य परिणामांबद्दल चिंता व्यक्त केली आहे. जर अमेरिकेने परस्पर शुल्क लादले तर भारतीय शेतकऱ्यांना मोठे नुकसान सहन करावे लागेल असा इशारा त्यांनी दिला आहे.

नरेंद्र मोदी यांच्या मंत्रिमंडळातील मंत्री अमेरिकेतील सरकारसमोर लोटांगण घालत असल्याचा आरोप चव्हाण यांनी केला आहे. या चर्चेमध्ये केवळ वाणिज्य मंत्रीच सहभागी होत आहेत. त्यांच्यासोबत कृषी, उद्योग आणि इतर मंत्र्यांना देखील सहभागी करुण घेण्याचे आवाहन चव्हाण यांनी केले आहे.

महत्त्वाचे म्हणजे भारताने आधीच आयात शुल्कात काही सवलती दिल्या आहेत. सप्टेंबर 2023 मध्ये, भारताने बदाम, सफरचंद, हरभरा, मसूर आणि अक्रोड यासह अनेक अमेरिकन उत्पादनावरील शुल्क उठवले आहे. या निर्णयामुळे अमेरिकन कृषी उत्पादक आणि उत्पादकांना फायदा होण्याची अपेक्षा आहे, 2024 मध्ये बदामांची निर्यात 1 अब्ज डॉलर्सपर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे.

शुल्क काढून टाकण्याचा भारत सरकारने घेतलेला निर्णय कदाचित अमेरिकेशी व्यापार संबंध सुधारण्यासाठी एक धोरणात्मक पाऊल होता. तथापि, चव्हाण यांनी नमूद केल्याप्रमाणे, आयात शुल्क आणखी कमी केल्याने अमेरिकेच्या कृषी आयातीत वाढ होऊ शकते, ज्यामुळे भारतीय शेतकऱ्यांचे नुकसान होण्याची शक्यता आहे.

या परिस्थितीत आंतरराष्ट्रीय व्यापार वाटाघाटींमध्ये गुंतागुंत आणि सरकारांनी स्पर्धात्मक हितसंबंध संतुलित करण्याची गरज आहे. 2 एप्रिल रोजी अमेरिकन सरकार आयात शुल्कांबाबत निर्णय घेण्याची तयारी करत असताना, भारतीय शेतकरी आणि धोरणकर्ते परिस्थिती कशी बदलते यावर बारकाईने लक्ष ठेवून आहेत. मात्र, या दरम्यान पृथ्वीराज चव्हाण यांनी व्यक्त केलेल्या शंकेमुळे चिंता वाढण्याची शक्यता देखील वर्तवली जात आहे.

**भारतीय शेतकऱ्यांवर मोठा परिणाम**

अमेरिके-सोबतच्या आयात आणि निर्यात शुल्काच्या मुद्द्यावर, पृथ्वीराज चव्हाण म्हणाले की, 2 एप्रिल रोजी, अमेरिकन सरकार आयात शुल्कांबाबत काही महत्त्वाचे निर्णय घेणार आहे. जर त्यांनी परस्पर शुल्क लागू केले तर महाराष्ट्र आणि भारतातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होईल.. जर भारत सरकारने सध्याच्या 40% वरून आयात शुल्क कमी केले, तर अमेरिकेतून कृषी उत्पादन भारतीय बाजारपेठेत येईल, ज्याचा भारतीय शेतकऱ्यांवर मोठा परिणाम होईल.

## सुरक्षा रक्षकाला मनसेकडून मारहाण

**मुंबई :** मराठी गया तेल लगाने असे वक्तव्य करणाऱ्या एल अॅन्ड टीच्या सुरक्षारक्षकाला पवईमध्ये मनसेच्या कार्यकर्त्यांनी चोप दिला आहे. मराठीच्या मुद्द्यावर मनसे स्टाईलने सुरक्षारक्षकाला हिसका दाखवला आहे. राज ठाकरेंच्या आदेशानंतर मनसे पदाधिकाऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतल्याचे दिसून येत आहे.

पवईतील एल अँड टी कंपनीच्या सुरक्षा रक्षकाने मराठी भाषेबद्दल असाच अनादर दाखवला. एका व्यक्तीशी बोलताना मराठी गेली तेल लावत असे म्हटल्याने महाराष्ट्र सैनिक आक्रमक झाले आणि त्यांनी त्याला चोप दिला. सुरक्षा रक्षक आणि तो व्यक्ती यांच्यात मराठीत बोलण्यावरुन वाद झाला. यानंतर महाराष्ट्र सैनिक तिथे पोहोचले व त्या सुरक्षारक्षकाला महाराष्ट्रातील मराठी माणसाची, राज ठाकरेंची माफी मागतो असे म्हणालयला लावत मनसे स्टाइलने समजावले. यावेळी महाराष्ट्र सैनिकांनी त्याला कानाखाली लगावली. यानंतर त्या सुरक्षारक्षकाने माफी मागत मी मराठी शिकण्याचा प्रयत्न करेल असे म्हटले आहे.

# मुंबई साखळी बॉम्ब स्फोट प्रकरण

# टायगर मेमनची प्रॉपर्टी केंद्राला सोपवा

### टाडा कोर्टाचे तब्बल ३२ वर्षांनंतर आदेश; १४ मालमत्तांचा समावेश

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :** मुंबई साखळी बॉम्बस्फोटांच्या ३२ वर्षांनंतर, विशेष टाडा न्यायालयाने टायगर मेमनची मालमत्ता केंद्राकडे सोपवण्याचे आदेश दिले आहेत. १९९३ च्या मुंबई बॉम्बस्फोट मालिकेचा सूत्रधार टायगर मेमन आणि त्याच्या कुटुंबाच्या १४ मालमत्ता केंद्र सरकारकडे सोपवण्यात याव्यात, असे विशेष टाडा न्यायालयाने म्हटले आहे.

टाडा (दहशतवादी आणि विध्वंसकारी क्रियाकलाप (प्रतिबंधक) कायदा) न्यायालयाच्या आदेशानंतर १९९४ पासून या मालमत्ता मुंबई उच्च न्यायालयाच्या रिसीव्हरच्या ताब्यात होत्या. १९९४ मध्ये विशेष टाडा न्यायालयाने या मालमत्ता जप्त केल्या होत्या आणि तेव्हापासून त्या हायकोर्टाच्या ताब्यात होत्या.

विशेष टाडा न्यायालयाचे न्यायाधीश व्ही.डी. केदार यांनी म्हटले आहे की, स्थावर मालमत्तेचा ताबा केंद्र सरकारकडे सोपवण्यात यावा.

परकीय चलन संवर्धन आणि तस्करी प्रतिबंधक कायदा, १९७४ आणि महाराष्ट्र सरकारच्या १९९२ च्या आदेशाच्या तरतुदींनुसार सुरू करण्यात आली.

१२ मार्च १९९३ रोजी मुंबईत १३ ठिकाणी साखळी बॉम्बस्फोट झाले, ज्यात २५७ जणांना आपला जीव गमवावा लागला आणि ७०० हून अधिक लोक जखमी झाले. नंतर सीबीआयने स्फोट प्रकरणाची चौकशी केली.

टायगर मेमन आणि त्याच्या कुटुंबाच्या मालकीच्या १४ मालमत्तांमध्ये वांद्रे (पश्चिम) येथील एका इमारतीतील एक फ्लॅट, माहीममधील एक कार्यालय, माहीममधील एक खुला भूखंड, सांताक्रूझ (पूर्व) येथील एक रिकामा भूखंड आणि एक फ्लॅट, कुर्ला येथील एका इमारतीतील दोन फ्लॅट, मोहम्मद अली रोडवरील एक कार्यालय, डोंगरी येथील एक दुकान आणि भूखंड, मनीष मार्केटमधील तीन दुकाने आणि मुंबईतील शेख मेमन स्ट्रीटवरील एक इमारत यांचा समावेश आहे.

२४ नोव्हेंबर १९६० रोजी जन्मलेल्या इब्राहिम मुश्ताक अब्दुल रझाक नदीम मेमन याला अंडरवर्ल्ड जगात टायगर मेमन म्हणून ओळखले जाते. त्याचे बालपण त्याच्या ५ लहान भावांसोबत दक्षिण मुंबईतील मोहम्मद अली रोड परिसरातील कडिया बिल्डिंगमधील एका खोलीच्या फ्लॅटमध्ये गेले.

मुश्ताकचे वडील अब्दुल रझाक वेल्डिंगचे काम करायचे. त्याने मुंबईतील



स्माइल बेग मोहम्मद स्कूलमधून दहावीपर्यंतचे शिक्षण पूर्ण केले. घरची आर्थिक परिस्थिती चांगली नसल्याने मुश्ताकने आपले शिक्षण अर्ध्यावरच सोडले आणि मुंबईतील मेमन सहकारी बँकेत शिपाई म्हणून काम करू लागला. पण तिथेही तो जास्त काळ राहू शकला नाही. चहा आणण्यावरून झालेल्या वादानंतर त्याने त्याच्या बँक मॅनेजरला मारहाण केली, त्यानंतर त्याला नोकरीवरून काढून टाकण्यात आले.

नोकरी सोडल्यानंतर मुश्ताकची भेट तस्कर मोहम्मद मुस्तफा दौसा याच्याशी झाली. त्याने त्याला आपला ड्रायव्हर म्हणून ठेवले. दौसासोबत काम करत असताना, मुश्ताक दुबईस्थित तस्कर याकूब भट्टीला भेटला आणि त्याला त्याचा वाहक म्हणून कामावर ठेवले.

आता मुश्ताकला दुबईहून सोन्याची तस्करी करण्याचे काम मिळाले होते. याच काळात मुश्ताक पाकिस्तानी तौफिक जालियनवाला यांच्या संपर्कात आला आणि अवघ्या एका वर्षातच मुश्ताक मुंबईचा सर्वात मोठा सोन्याचा तस्कर बनला. मुंबईत आपल्या धाडसासाठी प्रसिद्ध असलेला मुश्ताक तस्करीच्या जगात टायगर म्हणून ओळखला जाऊ लागला.

मुंबईत झालेल्या दंगलीत टायगर मेमनने सुरू केलेल्या तिजारत इंटरनॅशनल कंपनीला आग लावण्यात आली. यामुळे संतप्त झालेल्या टायगरने मुंबईत बॉम्बस्फोट घडवून आणण्याची योजना आखण्यास सुरुवात केली. हे साध्य करण्यासाठी, टायगरने दुबईमध्ये पाकिस्तानी तस्कर तौफिक जालियनवाला, अनीस इब्राहिम, मुस्तफा डोसा, काही आयएसआय अधिकारी आणि अनेक श्रीमंत अरब व्यावसायिकांसोबत एक बैठक घेतली. गुप्तचर सूत्रांच्या माहितीनुसार, टायगरला या बैठकीसाठी दाऊद इब्राहिमकडून सूचना मिळाल्या होत्या.

## आडवाणी आणि मोदींवर संजय राऊत यांचे वादग्रस्त वक्तव्य

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटाचे खासदार संजय राऊत यांनी भाजपचे ज्येष्ठ नेते लालकृष्ण आडवाणी आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याबाबत वादग्रस्त विधान केले आहे.

राऊत यांनी आडवाणी यांची तुलना मुघल सम्राट शहाजहान यांच्याशी केली असून, त्यांना जिवंत असताना सत्तेपासून दूर ठेवण्यात आल्याचा आरोप केला. यासोबतच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या निवृत्तीच्या मुद्द्यावरही त्यांनी प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

संजय राऊत म्हणाले, लालकृष्ण आडवाणी जिवंत असताना त्यांना शहाजहानाप्रमाणे कोंडून ठेवण्यात आले आणि नरेंद्र मोदी दोन वेळा पंतप्रधान झाले. मुघली संस्कृतीप्रमाणे त्यांना सत्तेपासून बेदखल करण्यात आले. तेव्हा आम्ही विचारले होते की, मुघली संस्कृतीप्रमाणे का वागले? आडवाणी यांचा पंतप्रधान आणि राष्ट्रपती पदावर हक्क होता. तो त्यांना का दिला नाही? राऊत यांनी हा सवाल उपस्थित करत भाजपच्या अंतर्गत धोरणांवर टीका केली.

**मोदींची निवृत्ती आणि फडणवीसांचे मत**

राऊत यांनी पुढे नरेंद्र मोदी यांच्या वयाचा मुद्दा उपस्थित केला. ते म्हणाले, १७ सप्टेंबर २०२५ रोजी नरेंद्र मोदी वयाची ७५ वर्षे पूर्ण करणार आहेत. त्यामुळे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना कितीही वाटत असले तरी त्यांना निवृत्त व्हावे लागेल. राऊत यांचे हे वक्तव्य फडणवीस यांच्या त्या दाव्याच्या पार्श्वभूमीवर आले आहे, ज्यात त्यांनी मोदी २०२९ पर्यंत पंतप्रधान राहतील, असे म्हटले होते. राऊत यांनी यावरून भाजपच्या नेत्यांमध्ये एकवाक्यता नसल्याचा दावा केला.

**भाजप-संघ संबंधांवर मौन**

भाजप आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघ (आरएसएस) यांच्यातील संबंधांबाबत राऊत यांनी भाष्य करण्याचे टाळले. ते म्हणाले, भाजप आणि संघ यांच्यातील संबंध कसे असावे, हा त्यांचा अंतर्गत प्रश्न आहे. त्यावर माज्यासारख्या बाहेरच्या माणसाने बोलण्याची गरज नाही. राऊत यांनी यावर तटस्थ भूमिका घेतली असली तरी त्यांच्या इतर वक्तव्यांमुळे राजकीय वर्तुळात चर्चा तापली आहे.

### महायुती सरकारच्या बजेटमध्ये
## ३२.५५% कपात

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :** महायुती सरकारने २०२४-२५ या आर्थिक वषार्साठी मंजूर केलेल्या बजट मध्ये तब्बल ३२.५५ टक्के कपात झाल्याची धक्कादायक माहिती समोर आली आहे. राज्यातील विविध विभागांसाठी एकूण ८,२९,८३१.२० कोटी रुपये खचार्साठी देण्यात आले होते.

मात्र, ३१ मार्च २०२५ पर्यंत केवळ ५,५९,७१३.०४ कोटी रुपये म्हणजेच ६७.४४ टक्के रक्कमच खर्च झाली. याचा अर्थ, तब्बल २,७०,११८.१६ कोटी रुपये सरकारला खर्च करता आले नाहीत. ही आकडेवारी महायुती सरकारच्या आर्थिक नियोजनावर आणि प्रशासकीय कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह निर्माण करते.

महायुती सरकारच्या या निधी खचार्तील त्रुटीमुळे विरोधकांना टीकेचे नवे आयुध मिळाले आहे. सरकारने मंजूर केलेल्या बजटातील जवळपास एक तृतीयांश रक्कम खर्च न करताच पडून राहिल्याने विकासकामांना खीळ बसल्याचा आरोप विरोधी पक्षांनी केला आहे. ₹महायुती सरकार हे केवळ घोषणाबाजीपुरते मर्यादित राहिले आहे. प्रत्यक्षात जनतेच्या हितासाठी निधी खर्च करण्याची इच्छाशक्तीच या सरकारकडे दिसत नाही,₹ अशी टीका विरोधी पक्षनेत्यांनी केली.

विविध विभागांना देण्यात आलेला निधी आणि त्यापैकी किती खर्च झाला, याचा तपशील पाहता अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांत मोठी तूट दिसून येते. शिक्षण, आरोग्य, पायाभूत सुविधा आणि ग्रामीण विकास यांसारख्या महत्त्वाच्या खात्यांमध्ये निधीचा अपुरा वापर झाल्याचे स्पष्ट होते. ३१ मार्च २०२५ पर्यंतच्या आकडेवारीनुसार, एकूण मंजूर निधीपैकी ३२.५५ टक्के रक्कम पडून राहिली, जी राज्याच्या प्रगतीसाठी चिंताजनक आहे.

## कुणाल कामराचा शो पाहणारे प्रेक्षकही अडचणीत
## मुंबई पोलिसांनी बजावल्या नोटीस

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :** मुंबई पोलिसांनी कुणाल कामराची स्टँडअप कॉमेडी पाहणाऱ्या काही प्रेक्षकांना नोटीसा बजावल्या आहेत. त्यामुळे आता कुणाल कामरानंतर त्याचा प्रेक्षकवर्गही अडचणीत सापडण्याची शक्यता आहे.



स्टँडअप कॉमेडियन कुणाल कामरा याने उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर केलेल्या एका विडंबनात्मक गाण्याचे राज्याचे वातावरण तापले आहे. या प्रकरणी शिवसैनिकांनी कुणाल कामराच्या हॅबिटेट स्टुडिओची तोडफोड केली. दस्तुरखुद्द मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनीही कामराला माफी मागण्याचा अन्यथा कडक कारवाईला सामोरे जाण्याचा इशारा दिला. या पार्श्वभूमीवर मुंबई पोलिसांनी कामराच्या प्रेक्षकांना नोटीस बजावल्याची माहिती आहे.

**प्रेक्षकांचा जबाब नोंदवण्यास सुरुवात**

वृत्तानुसार, कुणाल कामराने 2 फेब्रुवारी रोजी मुंबईतील 'युनिकॉन्टिनेंटल' हॉटेलमधील 'द हॅबिटेट' या स्टुडिओमध्ये 'नया भारत' हा स्टँडअप कॉमेडी शो आयोजित केला होता. या शोमध्ये त्याने एकनाथ शिंदे यांच्यावरील विडंबनात्मक कविता सादर केली होती.

पोलिसांनी या शोला जे प्रेक्षक उपस्थित होते त्यांना देखील नोटिसा बजावल्या आहेत. पोलिस या शोमधील प्रेक्षकांचे जबाब नोंदवणार असून काही प्रेक्षकांचे जबाब घेण्यास प्रत्यक्षात सुरुवातही झाली आहे. पोलिसांनी कलम 179 अंतर्गत प्रेक्षकांना नोटिसा बजावल्या आहेत.

या कलमांतर्गत पोलिसांना प्रेक्षकांना चौकशीसाठी बोलावण्याचा अधिकार आहे. माजी आयपीएस अधिकारी व वकील वाय. पी. सिंह यासंबंधी बोलताना म्हणाले, पोलिसांना या शोमधील एक-दोन प्रेक्षकांना चौकशीसाठी बोलावण्याचा अधिकार आहे. पण या प्रकरणात इलेक्ट्रॉनिक पुरावे उपलब्ध असल्याने प्रेक्षकांना चौकशीसाठी बोलावण्याची आवश्यकता नाही.

**दोनदा समन्स, पण हजर नाही**

उल्लेखनीय बाब म्हणजे मुंबई पोलिसांनी आतापर्यंत कुणाल कामराला 2 वेळा समन्स बजावला. पण त्यानंतरही तो चौकशीसाठी हजर झाला नाही. त्यामुळे खार पोलिसांनी मुंबईतील माहिम येथील कुणाल कामराच्या वडिलांच्या घरी जाऊन त्यांची चौकशी केली. तुमचा कुणालशी संपर्क झाला आहे का? तो मुंबईत येणार आहे का? चौकशीसाठी हजर होणार आहे का? असे विविध प्रश्न पोलिसांनी त्यांना विचारले.

दुसरीकडे, पोलिसांनी आपल्या आई-वडिलांची चौकशी केल्याचे समजताच कुणाल कामराने एका ट्विटद्वारे मुंबई पोलिसांवर टीका केली आहे. या पोस्टमध्ये त्याने म्हटले आहे की, ज्या घरात मी 10 वर्षांपासून राहत नाही, तिथे जाऊन पोलिसांनी चौकशी केली. या सगळ्यासाठी पोलिस त्यांचा वेळ व संसाधने वाया घालवत आहेत.

## कार अडवून लुटणाऱ्या पाच जणांना अटक

■ **महासागर प्रतिनिधी, नाशिक, दि. १ :** व्यापाऱ्यांची कार अडवून रोख रक्कम २५ लाखाची लूट करणाऱ्या पाच आरोपींना किल्ला पोलिसांनी अटक केली आहे. त्यांच्याकडून ११ लाख २५ हजारांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून आठ दिवस पोलीस कोठडी देण्यात आली आहे.

संकेत ट्रेडिंग कंपनीचे व्यापारी मनोज मुथ्था व त्यांचे भाऊ मालेगाव शहराकडे जात असतांना अनोळखी ६ आरोपींनी त्यांची कार अडवली. कोयत्यासारख्या हत्याराचा धाक दाखवून, कारच्या काचा फोडून रोख २५ लाख व खरेदी विक्रीचे रजिस्टर जबरीने घेऊन पळून गेले होते.याप्रकरणी किल्ला पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेने आरोपींच्या मुसक्या आवळल्या.

## नेत्यांनी शेतकऱ्यांच्या जमिनी हडपल्या..

### अंजली दमानिया यांचा पत्रकार परिषदेत गंभीर आरोप

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. १ :** सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी आज मुंबईत आयोजित पत्रकार परिषदेत बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्या छळाचा आणि त्यामागील कथित कटाचा मोठा खुलासा केला.



यावेळी त्यांनी राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि राज्याचे अन्न व नागरी पुरवठा माजी मंत्री धनंजय मुंडे यांचे सहकारी राजेंद्र घनवट यांच्यावर गंभीर आरोप केले. दमानिया यांनी घनवट आणि मुंडे यांच्यातील कथित आर्थिक संबंध आणि शेतकऱ्यांच्या जमिनी हडपण्याच्या प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली आहे.

पत्रकार परिषदेत अंजली दमानिया यांनी सांगितले की, बीडमधील शेतकरी आणि विशेषतः शेतकरी महिलांना राजेंद्र घनवट यांच्याकडून सातत्याने छळाला सामोरे जावे लागत आहे. त्यांनी धनंजय मुंडे आणि राजेंद्र घनवट यांचे एकत्र फोटो दाखवत या दोघांमधील जवळीक असल्याचा दावा केला.

दमानिया यांनी म्हटले की, घनवट यांनी धमक्या देऊन शेतकऱ्यांच्या जमिनी स्वस्तात खरेदी केल्या आणि शेतात काम करणाऱ्या महिलांना शिवीगाळ केली. याशिवाय, घनवट यांनी नऊ शेतकऱ्यांवर खोटे गुन्हे दाखल केल्याचा आरोपही त्यांनी केला.

पत्रकार परिषदेत पीडित शेतकरी मीरा सोनवणे आणि राजेंद्र सोनवणे यांनी आपली व्यथा मांडली. मीरा सोनवणे म्हणाल्या, २००८ पासून आम्ही न्यायासाठी फिरत आहोत, पण आम्हाला काही मिळत नाही. त्या माणसाची खूप दहशत आहे.

धनंजय मुंडे यांनी पोलीस ठाण्यात फोन करून आमच्यातील आठ जणांवर गुन्हे दाखल करण्यास सांगितले. मी पोट भरण्यासाठी घुंगरू बांधून नाचते. पोपट घनवट आणि राजेंद्र घनवट यांची गुंडाची टोळी आहे. आम्हाला न्याय द्यावा, नाही तर फाशी द्यावी. आमच्याकडे जमीन असताना अशी वेळ आली आहे.

राजेंद्र सोनवणे यांनीही आपली कैफियत मांडली. ते म्हणाले, पोपट घनवट यांचा माज्या वडिलांना फोन आल्यानंतर त्यांना हृदयविकाराचा झटका आला. त्यानंतर त्यांचा मृत्यू झाला. नंतर घनवट यांच्याकडून एक माणूस आला आणि म्हणाला की, तुमच्या वडिलांनी जमीन विकली आहे. आता ती जमीन त्यांच्या ताब्यात आहे. या दोन्ही पीडितांनी घनवट यांच्यावर जमीन हडपल्याचा थेट आरोप केला.

**दमानिया यांचा सरकारवर हल्लाबोल**

अंजली दमानिया यांनी बीडमधील परिस्थितीवर तीव्र नाराजी व्यक्त केली. त्या म्हणाल्या, असंख्य सामान्य लोकांना जगणे कठीण झाले आहे. राजेंद्र घनवट आणि पोपट घनवट यांनी शेतकऱ्यांच्या जमिनी लाटल्या आहेत.

धनंजय मुंडे आणि घनवट यांच्यातील आर्थिक व्यवहारांची चौकशी झालीच पाहिजे. त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार आणि महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांना शेतकऱ्यांना मदत करण्याचे आणि त्यांच्या जमिनी परत मिळवून देण्याचे आवाहन केले.

**वाल्मिक कराड यांचाही उल्लेख**

दमानिया यांनी यावेळी वाल्मिक कराड यांचे नावही जोडले. त्या म्हणाल्या, वाल्मिक कराड यांच्या अनेक प्रॉपर्टी पुण्यात आहेत. वाल्मिक कराड, धनंजय मुंडे आणि राजेंद्र घनवट ही एक साखळी आहे. या सर्वांची चौकशी झाली पाहिजे. पुणे, खेड आणि चाकण परिसरातील शेतकरीही या पत्रकार परिषदेत सहभागी झाले होते आणि त्यांनी आपली व्यथा मांडली.

दमानिया यांनी शेतकऱ्यांच्या जमिनी परत मिळवून देण्यासाठी सरकारने तातडीने पावले उचलावीत, अशी मागणी केली. बीडमधील शेतकऱ्यांचा छळ आणि जमीन हडपण्याच्या या प्रकरणाने राज्यातील राजकीय वातावरण पुन्हा एकदा तापण्याची शक्यता आहे. सरकार यावर काय कारवाई करते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# सयाजी शिंदेंनी घेतली देशमुख कुटुंबीयांची भेट

■ **वृत्तसंस्था, बीड, दि. १ :** जिल्ह्यातील मस्साजोग गावचे सरपंच संतोष देशमुख यांचं अपहरण करून त्यांची हत्या करण्यात आली. त्यांच्या हत्येचे व्हिडीओ आणि फोटो तपासादरम्यान पोलिसांच्या हाती लागले. त्यानंतर या हत्येमागचा मास्टरमाईंड वाल्मिक कराड आणि आरोपी सुदर्शन घुले यांना अटक करण्यात आली. या प्रकरणात अनेक नवे खुलासे समोर येत असतानाचा अभिनेते सयाजी शिंदे यांनी संतोष देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली आहे.

अभिनेते सयाजी शिंदे यांनी आज मस्साजोगमध्ये जाऊन देशमुख कुटुंबीयांची भेट घेतली. त्यावेळी त्यांनी संतोष देशमुख यांचे भाऊ धनंजय देशमुख यांच्याशी संवाद साधताना दिसले. गेल्या काही दिवसांपासून अनेकजण धनंजय देशमुख आणि संतोष देशमुख यांच्या कुटुंबीयांची भेट घेत आहेत. दरम्यान, अभिनेते सयाजी शिंदे यांनी देशमुख कुटुंबीयांचे सांत्वन केले. त्यांच्या भेटीचा



व्हिडीओ सोशल मीडियावर व्हायरल झाला आहे.

कळंब शहरामध्ये एका घरात एका महिलेचा मृतदेह आढळून आला आहे. मनीषा कारभारी बिडवे असे या मृत महिलेचे नाव आहे. या महिलेचा वापर संतोष देशमुखांना अडकवण्यासाठी करण्यात येणार होता असा आरोप ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानियांकडून करण्यात आला आहे.

या आरोपामुळे खळबळ उडाली आहे. उपविभागीय पोलीस अधिकारी संजय पवार यांनी या प्रकरणावर बोलताना, कळंबमध्ये जी महिला मृत अवस्थेमध्ये आढळून आली, तपासाअंती तिचा संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाशी अद्याप कोणताही संबंध आढळून आलेला नाही. पोलिसांकडून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे, जर या महिलेचा संतोष देशमुख हत्या प्रकरणात काही संबंध आढळला तर त्याची माहिती दिली जाईल.

मनिषा कारभारी बिडवे असं या महिलेचं नाव आहे, तिची हत्या झाली असावी असा पोलिसांचा प्राथमिक अंदाज आहे. महिलेच्या डोक्याला मार लागल्याने तिचा मृत्यू झाल्याचं पोस्टमार्टम रिपोर्टमधून समोर आलं आहे.

महिलेच्या मृत्यू प्रकरणी दोन आरोपी निष्पन्न झाले आहेत, आरोपींना पकडण्यासाठी पथके रवाना करण्यात आले असून, लवकरात लवकर या प्रकरणातील आरोपीला पकडलं जाईल असं संजय पवार यांनी म्हटलं



# मशीद व ईदगाह वर ईदची नमाज ईद-उल-फितर उत्साहात साजरी

▪अकोला,दि ३१ (प्रतिनिधी): ईद उल फितर सण सोमवारी अकोला शहरात उत्साह आणि बंधुत्वाच्या वातावरणात साजरा करण्यात आला. शहरातील सर्व मशिदी आणि ईदगाहमध्ये हजारो मुस्लिम बांधवांनी ईदची नमाज अदा करून अल्लाहचे आभार मानले. आ. साजिद खान पठाण, जिल्हाधिकारी अजित कुंभार आणि पोलिस अधीक्षक बच्चन सिंग यांनी प्रशासनाच्या वतीने मुस्लिम बांधवांचे स्वागत केले.



अकोल्यातील हरीहरपेठेतील ईदगाहसह कच्छी मशिदीत ईद- उल-फितरच्या दोन नमाज आयोजित करण्यात आल्या. ज्यात मोठ्या संख्येने मुस्लिम बांधव सामील होते. पहिली जमात सकाळी ८:४५ वाजता पार पडली, ज्याची इमामत प्रसिद्ध इस्लामी विद्वान मुफ्ती मो. सादिक अख्तर रजवी मर्कजी यांनी केले. दुसरी जमात सकाळी ९:४५ वाजता आयोजित पकरण्यात आली, ज्यामध्ये नायब इमाम मौलाना आरिफ रजा यांनी नमाज पढवली. दोन्ही नमाजा नंतर ईदच्या आनंदात सामील झाले. नमाजानंतर कच्छी मशिदीचे अध्यक्ष जावेद जकरिया यांनी सर्वांना ईदच्या शुभेच्छा दिल्या. तसेच, अहले सुन्नत जमातचे अध्यक्ष हाजी मुदाम खान यांनी देखील ईदच्या शुभेच्छा देऊन समाजात बंधुत्व, प्रेम आणि सौहार्द टिकवण्याचा संदेश दिला.अकोल्यातील ऐतिहासिक हरिहरपेठ ईदगाह, खदान ईदगाह, अकोट फ़ाइल ईदगाह, नायगाव ईदगाह, शिवनी ईदगाह याशिवाय, शहरातील सर्व मशिदींमध्येही ईदची नमाज अदा करण्यात आली.

सामाजिक सलोखा जपणारा रमजान: मुर्तिजापुरचा प्रेरणादायी उपक्रम

# बंधूभावाची साक्ष: हिंदू-मुस्लिम एकतेने सजलेला रमजान उत्सव



▪मुर्तिजापुर,दि ३१ (प्रतिनिधी): रमजाननिमित्त पठाणपुरा ईदगाहवर मुस्लिम समाजाने शांततेत सामूहिक नमाज अदा केली. मौलाना उस्मान यांनी नमाज पठण केले तर मुफ्ती मुंताजीम यांनी उपस्थितांना मार्गदर्शन केले. या ठिकाणी हजारो मुस्लिम बांधवांनी सामूहिक नमाज अदा करत राष्ट्रीय एकता अबाधित राहावी, असा संदेश दिला. 'धर्म ही वैयक्तिक श्रद्धा असली तरी सामाजिक सलोखा आणि ऐक्य यावरच समाजाचा पाया मजबूत असतो' असा प्रेरणादायी संदेशही यावेळी देण्यात आला.

यानंतर स्टेशन परिसरातील मशीदसमोर हिंदू समाजबांधवांनी मुस्लिम बांधवांचे पुष्पगुच्छ आणि दुपट्ट्यांनी हार्दिक स्वागत करून सामंजस्याचा संदेश दिला. 'गर्वसे कहो, हम सब एक हैं!' या घोषवाक्याने हिंदू-मुस्लिम ऐक्याचे दर्शन घडवले.

या स्वागत समारंभात अँड. नसिर शेख यांच्या अध्यक्षतेखाली मौलाना जाहेद आलम, ज्येष्ठ समाजसेवक मो. इलियास मास्टर, पत्रकार अन्वर खान, मन्सूर राही, अँड. उजैर अहमद आदी मान्यवर उपस्थित होते. नुकतेच न्यायाधीश पदी नियुक्त झालेल्या अँड. उजैर अहमद यांचा यावेळी विशेष सत्कार करण्यात आला.

कार्यक्रमात बोलताना अँड. नसिर शेख यांनी सांस्कृतिक ऐक्य आणि शांततेचे महत्त्व स्पष्ट केले. त्यांनी असे सांगितले की, 'समाजात सुसंवाद आणि समजूतदारपणा असला की कोणतीही अडचण सोडवता येते.' मौलाना जाहेद आलम यांनी धार्मिक सलोख्याचे महत्त्व अधोरेखित केले. उपस्थित मान्यवरांनीही समाजातील ऐक्य आणि सद्भावना वाढवण्याचा निर्धार व्यक्त केला.

# मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना, जिल्ह्यातील आठशे नागरिकांना विशेष रेल्वेने अयोध्या दर्शन

▪अकोला,दि ३१ (प्रतिनिधी): मुख्यमंत्री तीर्थ दर्शन योजना अंतर्गत ११ एप्रिल रोजी अकोला जिल्ह्यातून ८०० जेष्ठ नागरिक विशेष रेल्वे दवारा अयोध्या श्रीरामाच्या दर्शनासाठी जात असून खासदार अनुप धोत्रे, आमदार रणधीर सावरकर हिरवा कंदील दाखवून रेल्वे यात्रे यांना रवाना करणार आहे. महायुती सरकारने ज्येष्ठ नागरिकांना तीर्थयात्रेचा लाभ व्हावा यासाठी ३०००० रुपयांचा निधी मंजूर केला आहे आणि त्या अंतर्गत अकोला जिल्ह्यातील समाज कल्याण विभागाच्या माध्यमातून ८००ज्येष्ठ नागरिकांना ११ एप्रिल ते पंधरा एप्रिल पर्यत अयोध्या दर्शनाचा लाभ अयोध्या काशी प्रयाग्रज या यात्रेचा



दर्शनाचा लाभ होणार आहे. यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री नामदार आकाश फुंडकर हे सुद्धा प्रामुख्याने उपस्थित राहणार असून जिल्ह्यातील आमदार प्रकाश भारसाकले, आमदार हरीश पिंपळे आमदार अमोल मिटकरी आमदार वसंत खंडेलवाल जिल्हाधिकारी अजित कुंभार डॉक्टर अनिता राठोडहे सुद्धा यावेळी उपस्थित राहणार आहे.साठ वर्षाच्या ज्येष्ठ नागरिकांनी महाराष्ट्र शासनाकडे व जिल्हाधिकारी मार्फत ऑनलाईन अर्ज केले होते त्यांच्यापैकी ८०० लोकांचा पहिली अकोला जिल्ह्यातील यात्रांची तयारी पूर्ण झाली असून ११ ते १५ एप्रिल पर्यंत हे भाविक भक्त तीर्थयात्रा करणार आहे रेल्वे स्टेशनवर भारतीय जनता पक्षाच्या वतीने ज्येष्ठ नागरिकांचा सत्कार व अभिनंदन करण्यात येणार असून या कार्यक्रमात सर्व धर्मप्रेमी नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे अशी विनंती किशोर पाटील जयंत मसने, विजय अग्रवाल, लोकेश तिवारी माधव मानकर गिरीश जोशी, राजू धोटे, टोल मारे महाराज, धोतरकर गुरुजी यांनी केली.

# पातूर तालुक्यात चोरीच्या घटनात वाढ

## श्वान पथक आणि फिंगरप्रिंट तज्ञांना पाचारण

▪पातुर,दि ३१ (प्रतिनिधी): तालुक्यात चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्यामुळे पोलीस प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे. पातूर पोलीस स्टेशन अंतर्गत मळसूर गावात प्रमोद प्रभाकर देवकते यांच्या घरात मध्यरात्री अज्ञात चोरट्यांनी २ लाख १० हजार रुपयांचे सोने-चांदीचे दागिने आणि रोख रक्कम लंपास केली.तालुक्यात चोरीच्या घटनांमध्ये दिवसेंदिवस वाढ होत असून पोलीस प्रशासनाच्या कार्यप्रणालीवर प्रश्नचिन्ह उपस्थित केल्या जात आहे. पातूर तालुक्यातील पोलिस स्टेशन चांनी अंतर्गत येत असलेले मळसुर या गावीतील रहिवाशी प्रमोद प्रभाकर देवकते यांच्या राहत्या घरी काही अज्ञात चोरट्यांनी



त्यांच्या घरातील डब्यातून सोने, चांदीचे दागिने व काही नगदी रुपय असे अंदाजी २ लाख १० हजार रुपयाचा मुद्देमाल लंपास केला. सदरचा प्रकार सकाळच्या सुमारास देवकते यांच्या निर्देशनास आला.

देवकते यांनी या बाबतची माहिति चांनी पोलिसांना दिली असून घटना स्थळी श्वान पथक व फिंगर प्रिंट एक्सपर्ट टीम ला पाचारण करण्यात आले आहे, सदर घराच्या आजू बाजूला जंगलाचा परिसर असल्याने चोर जंगलात पळून गेले असल्याचा अंदाज गावकऱ्यांनी व्यक्त केला असून पुढील तपास चान्नी पोलीस करीत आहे.

# अकोला मार्गे हैदराबाद भावनगर-हैदराबाद विशेष रेल्वे

▪अकोला,दि ३१ (प्रतिनिधी): उन्हाळ्यामध्ये प्रवाशांची वाढती गदी लक्षात घेता, दक्षिण मध्य रेल्वेने हैदराबाद आणि भावनगर टर्मिनसदरम्यान एक विशेष रेल्वे चालवण्याचा निर्णय घेतला आहे. ही विशेष रेल्वे नांदेड, अकोला, भुसावळ आणि अहमदाबाद मार्गे धावणार आहे,ज्यामुळे प्रवाशांना अतिरिक्त पर्याय उपलब्ध होणार आहेत. या विशेष रेल्वेसाठी आरक्षण ३० मार्च रोजी सकाळी ८:०० वाजता सुरू झाले आहे. प्रवासी अधिकृत रेल्वे बुकिंग प्लॅटफॉर्मवरून तिकीट बुक करू शकतात. ट्रेन क्रमांक ०७०६१ हैदराबाद भावनगर टर्मिनस स्पेशल हैदराबादहून दर शुक्रवारी १९ वाजता सुटेल, शनिवारी ९ वाजता अकोला येथे पोहोचेल आणि रविवारी ५ वाजता भावनगर टर्मिनस येथे पोहोचेल. ही सेवा ४ एप्रिल ते २७ जूनपर्यंत उपलब्ध असेल. परतीच्या प्रवासासाठी, ट्रेन क्रमांक ०७०६२ भावनगर टर्मिनस हैदराबाद स्पेशल भावनगर टर्मिनस येथून दर रविवारी १०:१५वाजता सुटेल, सोमवारी ०३:४० वाजता अकोला येथे पोहोचेल आणि सोमवारी १६:४५ वाजता हैदराबादला पोहोचेल. ही सेवा ६ एप्रिल ते २९ जूनपर्यंत उपलब्ध असेल. प्रवाशांना त्यांच्या प्रवासाच्या योजना निश्चित निश्चित करण्यासाठी लवकर तिकीट बुक करण्याचा सल्ला देण्यात आला आहे. अधिक माहितीसाठी, ते भारतीय रेल्वेच्या अधिकृत वेबसाइटला भेट देऊ शकतात किंवा रेल्वे चौकशी सेवांशी संपर्क साधू शकतात.

# इफ्तार पार्टी हा एकता सद्भावनेचा संदेश: आ.अमोल मिटकरी

## फरहान अमीन यांच्यावतीने इफ्तार पार्टचे आयोजन

▪पातूर,दि ३१ (प्रतिनिधी): इफ्तार पाटी हा एकता सदभावनेचा संदेश असून अशी इफ्तार पाटी भविष्यात ही आयोजित करण्यात यावे अशे प्रतिपादन विधानपरिषद सदस्य आमदार अमोल मिटकरी यानी केले. स्थानिक पातुर येथील असलेले होटल ग्रन्ड महेफिल येथे इफ्तार पाटी चे आयोजन राष्ट्रवादी व विद्यार्थी काँग्रेसचे प्रदेश सचिव फरहान अमिन यानी केले होते या इफ्तार पाटी मध्ये शहरातील विभीन्न क्षेत्रातील तथा




विभिन्न समाजाचे नागरिकाची उपस्थिती होती मंचावर कार्यक्रमाचे अध्यक्ष आमदार अमोल मिटकरी तर प्रमुख अतिथी आयुर्वेद महाविद्यालयाचे संचालक डा. साजिद शेख, सामाजिक कार्यकर्ते धनंजय मिश्रा, प्रशांत निकम अकरिम सर, डा वकार अन्सारी, किराणा असोसिएशनचे अब्दुल कुदुस,डाक्टर असोशिएशन चे अध्यक्ष डा नंदकिशोर राऊत अ भा मराठी पत्रकार संघांचे तालुका अध्यक्ष सतिश सरोदे आदि उपस्थिती होती कार्यक्रमाचे संचालन धनंजय मिश्रा यानी केले आभार प्रदर्शन फरहान अमिन यानी केलेकार्यक्रमाचे यशा करिता नातिक शेख, सैय्यद साद, सय्यद फैजान, नाझिम शेख, तौकिर अहेमद, खिजर खान यानी परिश्रम केले.

# आढळला काटेपूर्णा धरणात सुरक्षा रक्षकाचा मृतदेह

▪अकोला,दि ३१ (प्रतिनिधी): काटेपूर्ण धरणावरील सुरक्षा रक्षकाचा मृतदेह आढळल्याने एकच खळबळ उडाली. धरणात व्यक्ती बुडाल्याची माहिती महान पोलिस चौकीमधील पोलिसांनी पिंजर पोलिस स्टेशनचे ठाणेदार गंगाधर दराडे यांना दिली. त्यांनी मानव सेवा आपत्ती बचाव पथकाचे प्रमुख दीपक सदाफळे यांना माहिती दिल्यानंतर त्यांनी व सुरक्षा रक्षक कुणाल नागपुरे (२३) यांचा मृतदेह पाण्याबाहेर काढला. यानंतर मृतदेह मूर्तिजापूर येथील शासकीय रुग्णालयात शवविच्छेदनाकरिता पाठविल्याची माहिती ठाणेदार गंगाधर दराडे यांनी दिली.

# तेल्हारा तालुक्यात ईद उत्साहात साजरी

▪तेल्हारा,दि ३१ (प्रतिनिधी): हिंदू बांधवांनी दिल्या ईद च्या शुभेच्छा. तेल्हारा तालुक्यात रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी तालुक्यात विविध ठिकाणी पोलिस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

तेल्हारा तालुक्यात रमजान ईद उत्साहात साजरी करण्यात आली यावेळी तेल्हारा शहर हिवरखेड अडगाव पचंगव्हाण तळेगाव बाजार माळेगाव गोर्धा येथे रमजान ईद उत्साहात साजरी करण्यात आली सकाळी दहा वाजता जामा मस्जिद मध्ये नमाज अदा करण्यात आली नमाज नंतर हिंदू बांधवांनी मुस्लिम बांधवांना ईद च्या शुभेच्छा दिल्या. तालुक्यातील



तळेगाव बाजार येथे रमजान ईद साजरी करण्यात आली यावेळी तळेगाव बाजार येथील माजी पोलीस पाटील भाऊसाहेब खारोडे मधुकरराव ठोंबरे रावसाहेब खारोडे सदानंद खारोडे उध्दव मानखैर सेवा सहकारी सोसायटी चे अध्यक्ष किशोर खारोडे हिंमत पाटील सागर मानखैर गोलु खारोडे मयुर खारोडे देवेंद्र भड. यांनी मुस्लिम बांधवांना शुभेच्छा दिल्या यावेळी जामा मस्जिद चे अध्यक्ष रशिद शा वायदभाई मो ईदरिस रफिकभाई मुजफ्फर भाई क्षमाभाई मो सिद्दिक साजिद खा जम्मुभाई नाशिरखा पठाण बबलुभाई भुराभाई सह गावातील मुस्लिम समाज मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## थोडक्यात

### पिंजर येथील शेतकऱ्यांची आत्महत्या

▪बार्शिटाकळी,दि ३१ (प्रतिनिधी): बार्शिटाकळी तालुक्यातील पिंजर येथील शेतकरी शंकरराव रामकृष्ण वानखडे (६०) यांनी भेंडगाव शेतशिवारातील शेतात गळफास घेऊन आत्महत्या केली. ही घटना २८ मार्चला उघडकी आली. या बाबतची माहिती पिंजर पोलिस स्टेशनचे ठाणेदार गंगाधर दराडे यांनी दिली आहे. तसेच या शेतकऱ्याकडे जनता बँक व गटाचे कर्ज होते. ते कर्ज कसे फेडायचे, या विचारात व तणावात ते नेहमी राहत असल्याची माहिती कुटुंबीयांनी दिली. त्यांचे पश्चाप पत्नी, दोन मुले व एक मुलगी असा परिवार आहे. शासनाने तत्काळ सदर शेतकऱ्याचे कर्जमाफ करून त्यांना आर्थिक मदत द्यावी, अशा प्रकारची मागणी होत आहे.

### विद्यार्थ्यांची विशेष आरोग्य तपासणी

अकोला : राष्ट्रीय बाल स्वास्थ्य कार्यक्रम अंतर्गत डीइआयसी येथे अंगणवाडी व शालेय विशेष तपासणी मोहीम २.० आरोग्य तपासणी करण्यात आली. जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. तरंगतुषार वारे, निवासी वैद्यकीय अधिकारी डॉ देशमुख यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय बाल स्वास्थ कार्यक्रम यांच्या माध्यमातून डी. इ. आय. सी येथे, अंगणवाडी व शालेय विशेष तपासणी मोहीम २.० तपासणी मोहिम राबविण्यात आली. या मोहिमेत मेंदूशी संबंधित विकार असलेल्या रुग्णांकरता न्यूरो फिजिशियन यांचा संदर्भित शिबीर घेण्यात आला. शिबीरात डॉ. कोमल घाटोळ, यांच्या माध्यमातून मुलांची तपासणी करून संदर्भित सेवा दिली.

# अवैध गौण खनिज चोरट्यांचा धुमाकूळ

▪वाडेगाव,दि ३१ (प्रतिनिधी): येथील निर्गुना नदी पात्रातून वाळू, माती, मुरूम सरीसपणे सुरु असून शासनाचा लाखो रुपयाचा महसूल बुडत आहे. तरी अधिकारी याकडे दुर्लक्ष करीत असल्या मुळे येथील जनता अचंभीत झाली आहे. रात्रभर ट्रॅक्टर मध्ये गौण खनिज भरून वाहतूक केली जाते. हे ट्रॅक्टर चालक यातील बरेच जण दारू पिऊन ट्रॅक्टर चालवतात अशोक नगर दलित वस्ती मधून छोट्या रस्त्यातून जोरात ट्रॅक्टर चालवतात रस्त्यात लोकं झोपलेले असतात. गुरे ढोरे रस्त्यावर असतात विशेष म्हणजे लहान लेकरे या रस्त्यावर खेळत असतात. एखादा अपघात झाला तर कोण जबाबदारी घेईल? असा प्रश्न उपस्थित झाला आहे. रात्री तलाठी, मंडळ अधिकारी, ठाणेदार यांना माहिती दिली असता. कोणीही प्रतिसाद दिला नाही. यावरून असे दिसते की, सब मिली भगत आहे. शासनाला लाखो रुपये चुना लावणाऱ्याचा बंदोबस्त करून दलित वस्तीतील लोकांना सुखासमाधानाने रात्री झोपू द्यावे अशी मागणी होत आहे.

## राजमाता अहिल्यादेवी होळकरांची जीवन गाथा

# घरा घरात पोहचवण्याचे काम रामनवमी शोभायात्रा करत आहे : अर्चना शर्मा

▪अकोला,दि ३१ (प्रतिनिधी): विश्व हिंदू परिषद, श्रीराम नवमी शोभायात्रा समिती व श्री जानकी वल्लभ मातृशक्ती सत्संग मंडळ अकोला यांच्या माध्यमातून शहरातील विविध भागात रामनवमीनिमित्त भजन संस्थेचे कार्यक्रम घेण्यात येत आहे त्यानिमित्त दिनांक २९ /३ /२०२५ ला डाबकी रोड स्थित जुने शहर गिताई मंगल कार्यालय येथे सामूहिक हनुमान चालीसा पठाण भजन संध्या सौ ज्योती शर्मा यांच्या सुमधुर वाणीतून करण्यात आले व अहिल्याबाई होळकर यांच्या जीवन चरित्रावर नाट्यात्मय नाटिका नृत्यरंजन कथ्थक अकॅडमी प्रियंका जोशी यांच्या संचाने सादर केले. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक अर्चना शर्मा यांनी केले कार्यक्रमाकरिता सौ सुहासनी ताई धोत्रे, मंजुशाताई सावरकर, चंदाताई




शर्मा,मीना कागरीवाल,मनिषा अनासने सुमन ताई गावंडे या मान्यवरांची उपस्थिती होती कार्यक्रम करिता ज्योती टोपरे, मनीषा भुसारी रेखा नालट सारिका देशमुख ,चित्रा बापट,छाया थोडसं चंदा ठाकूर कल्पना अडसुले मालती रणपिसे सुरेखा नबापुरे , संतोष शर्मा, वैशाली शेगोकर, नीता बागडे, अलका देशमुख,संगीता मांगते,सोनल शर्मा यांनी अथक परिश्रम घेतले कार्यक्रम करीता रुक्मिणी पुरी,मीरा वानखडे, सौ दिपिका चोपडे ,मनिषा देशपांडे, प्रीती गुखुद्दे आभार प्रदर्श पुष्पा वानखडे यांनी केले.

# बाल संस्कार हे योग्य दिशेने टाकलेले पहिले पाऊल होय : ज्ञानेश्वर महाराज वाघ

▪अकोला,दि ३१ (प्रतिनिधी): मानवी जीवन हे संस्कारक्षम असून, त्याला योग्य दिशा मिळण्याकरिता एका सुयोग्य मार्गदर्शकाची नितांत गरज असते. तो मिळावा म्हणूनच अनेक जण आजन्म त्याचा शोध घेत असतात. परंतु त्यांच्या पदरी सदैव निराशाच पडत असते.

त्याची सर्वात महत्त्वाचे कारण म्हणजे मुळातच शोधण्याची चुकलेली पद्धत होय . योग्य दिशेने पाऊल टाकल्यानंतर मार्गदर्शक शोधावा लागत नसून तो मिळतच असतो. बालसंस्कार हे उच्च ध्येयाप्रत पोहोचण्याच्या दृष्टिकोनातून योग्य दिशेने टाकलेले पहिले पाऊल होय असे



अनुभवपूर्ण मत भागवताचार्य श्री ज्ञानेश्वर महाराज वाघ यांनी मांडले. ते आज श्री संत वासुदेवजी महाराज स्मृति मंदिर श्री ज्ञानेश आश्रम वारी भैरवगढ येथे साडेतीन मुहूर्तांपैकी एक पूर्ण मुहूर्त असलेल्या गुढीपाडवा नामक मराठी नूतन वर्षाच्या निमित्ताने बहुसंख्येने दर्शनाकरिता आलेल्या पालक व बालक यांच्याशी अनौपचारिक रित्या सुसंवाद साधत असतांना बोलत होते. ते पुढे म्हणाले की, जे पालक स्वतःच्या बालकांना जागतिक स्पर्धेत टिकण्याच्या नावाखाली त्याला त्यांच्या संस्काररूपी न्याय हक्कापासून वंचित करीतात ते स्वतःच स्वतःच्या हाताने वृद्धाश्रमाचे आरक्षण निश्चित करीत असतात.

भारतासारख्या संस्कृतीनिष्ठ देशांमध्ये अनाथाश्रम आणि वृद्धाश्रम निर्माण होणे हे फार मोठी शोकांतिका असून, या समस्येवर वेळीच मात करायची असेल तर बालसंस्काराशिवाय दुसरा योग्य पर्याय नाही. भारतीय संस्कृती ही वर्णाश्रमानी युक्त असून ; ब्रह्मचारी व गृहस्थ या दोन आश्रमांचे नियम योग्य पद्धतीने न पाळल्या गेल्यामुळे त्यातून अनाथाश्रम तर, वानप्रस्थ आणि संन्यास या आश्रमांची नियमावली न सांभाळल्याने त्यातून वृद्धाश्रम निर्माण होऊन आज रोजी आश्रम संख्या चार वरून सहा झाल्याचे निदर्शनास येते.

म्हणून आपली संतती ही म्हातारपणात आपल्या संतापाची नाही तर , सांभाळण्याची व्यवस्था व्हावी असे वाटत असणाऱ्या सुज्ञ मातापित्यांनी प्रत्येक बालकाला बालपणीच संस्काराचे बाळकडू पाजून त्याला न चुकता संस्कृतीच्या शक्तीवर्धक जन्म घुट्टीची मात्रा दिली पाहिजे. तरच तो म्हातारपणात आपल्या आज्ञेचे पालन व आपले पोषण करेल.त्याकरिता शुभस्य शिघ्रम या न्यायाने या शुभकार्याचा तात्काळ शुभारंभ करून येत्या १ मे ते २० मे २०२५ पर्यत श्री ज्ञानेश आश्रम येथे आयोजित श्री माऊली सर्वांगीण विकास बालसंस्कार शिबिरामध्ये आपल्या पाल्यांना पाठविले पाहिजे.तसेच या कार्याकरिता तन-मन-धनाने सरळ हाताने मदत करण्याचे आवाहन सुद्धा महाराजांनी यावेळी उपस्थितांना केले. असे शिबिर व्यवस्थापक श्री ज्ञानेश्वर महाराज भालतिलक हे कळवितात.

# महासागर अकोला

●मंगळवार, दि.१ एप्रिल २०२५




## हत्यांकांडातील फरार आरोपी जेरबंद!

**अकोला :** खदान पोलिस स्टेशन हद्दीतील जेतवन नगर चौकात ऑटोचा धक्का लागल्याच्या कारणावरून दोन गट आमने-सामने येत त्यांनी सशस्त्र राडा करून तिघांना गंभीर जखमी केले. यामध्ये करण उर्फ बाबू दशरथ शितळे या २३ वर्षीय युवकाची धारदार शस्त्राने हत्या करण्यात आली. यातील एका फरार आरोपी शेख फैजान खान अन्वर खान (१९) रा. हैदरपुरा, जेतवन नगर याला अटक केली आहे. त्याला न्यायालयात हजर केले असता, ३१ मार्चपर्यंत पोलिस कोठडी ठोठावण्यात आली आहे. २३ मार्च रोजी खदान पोलिस स्टेशन येथे फिर्यादी वैभव पुरुषोत्तम शितळे रा. जिल्हा परिषद कॉलनी खडकी यांनी उपचारादरम्यान सर्वोपचार रुग्णालय येथे दिलेल्या बयाणावरून आरोपी मयूर श्रावण मस्के, प्रशिक राजेश जावळे, निखिल सुभाष कांबळे, संगम संतोष सोनकांबळे आणि अधिक चार विधिसंघर्षग्रस्त बालक व आणखी एक इसम या आरोपींनी यातील साक्षीदार संतोष वरोठे यांच्यासोबत ऑटोचा धक्का लागल्याच्या कारणावरून वाद झाल्याने फिर्यादी व साक्षीदार तसेच प्रकरणातील मृतक करण उर्फ बाबू दशरथ शितळे त्यांना समजावण्यास गेले असता, यातील घटनास्थळी आरोपींनी गैरकायद्याची मंडळी जमवून हातात शस्त्र घेऊन फिर्यादी व फिर्यादीचा भाऊ करण शितळे व साक्षीदार यांच्यावर धारदार शस्त्राने प्राणघातक हल्ला चढविला. या हल्ल्यामध्ये करण उर्फ बाबू दशरथ शितळे यांची हत्या केली व साक्षीदार यांच्यावर प्राणघातक हल्ला करून गंभीर जखमी केले, अशा फिर्यादीच्या बयाणवरून यातील आरोपींविरूध्द खदान पोलिस स्टेशन येथे गुन्हा नोंद केला आहे.

## उड्डाणपुलावर वाढते अपघात

## चिंतेची बाब दोन वाहनांची भिडंत

■**अकोला,दि. ३१ (प्रतिनिधी):** अशोक वाटिका चौक परिसरातील उड्डाणपुलावर काळी पिवळीने किया कंपनीच्या गाडीला जोरदार टक्कर दिली. २९ मार्च रोजी दुपारी टॉवरच्या दिशेने जाणारी काळी पिवळी क्रमांक चक ३० P ५६८६ या चालकाचे नियंत्रण सुटल्याने उड्डाणपुलावरील डिव्हायडरला जोरदार धडक मारली आणि समोरून येणाऱ्या किया चारचाकी गाडी क्रमांक MH२७ DE४६५१ ला जाऊन धडकली. या अपघातामध्ये दोन्ही गाडीचे नुकसान झाले. कोणतीही जीवितहानी झाली नाही. घटनास्थळावर खदान पोलीस स्टेशनचे कर्मचारी दाखल झाले.पंचनामा करून दोन्ही चालकांना वाहनासह चौकशीसाठी नेण्यात आले. उड्डाणपूल शहरातील वाहतुक होण्यासाठी बांधण्यात आला आहे परंतु पुल निर्माणाचे काम झाल्यापासून असंख्य अपघात याच रहदारी सुरळीत पुलावर होत आहेत. नो एन्ट्री मधून प्रवाशी वाहतुक करीत असतात, याकडे वाहतूक पोलिसांचे दुर्लक्ष होताना



दिसते. याच उड्डाणपुलावर टावर परिसरात अनेक नागरिक सेल्फ व रील बनवीत असतात, त्यामुळे सुद्धा वाहतुकीमधे नेहमीच अटडथळा निर्माण होत असतो.याच उड्डाणपुलावर अनेक अपघातामध्ये काही नागरिकांचे प्राण गेले असून आज किती अशा घटना बघावयाचे आहे, असा प्रश्न नागरिकांनी उपस्थित केला आहे. जिलहा पोलीस अधीगक यांनी सदर उड्डाणपुलावर नेहमीसाठी पोलिसांचा बंदोबस्त ठेवावा अशी ही मागणी नागरिकांकडून होत आहे.

## गोंधळवाडी फाटा येथे अपघात

## स्विफ्ट डिझायरच्या धडकेत शिक्षक ठार

■**पातुर,दि. ३१ (प्रतिनिधी):** तालुक्यातील गोंधळवाडी फाटा येथे ३० मार्च रोजी पहाटे २:२० वाजता भरधाव वेगाने आलेल्या स्विफ्ट डिझायर (चक.०४ गत ९३०१) या गाडीच्या धडकेत एका व्यक्तीचा मृत्यू झाला सदर व्यक्ती ही शिक्षक असल्याचे समजले आहे.



या प्रकरणी पातूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.फिर्यादी गोपाल श्रीपत भराडे (वय ५६, व्यवसाय - शेती, रा. धोदानी, ता. पातूर) यांनी दिलेल्या माहितीनुसार, संबंधित वाहन चालकाने निष्काळजीपणे आणि भरधाव वेगाने वाहन चालवत त्यांच्या भावाला जोरात धडक दिली. या अपघातात फिर्यादीच्या भावाचा जागीच मृत्यू झाला.

पोलिस कारवाई:यासंदर्भात पातूर पोलीस ठाण्यात कलम २८१, १२५(ब), १०६ BNS सह कलम १३४, १८४ मोटार वाहन कायदा-१९८८ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

सदर प्रकरणाचा तपास कऊ संबोधी इंगळे (ब.न. ११४७) करीत आहेत. अपघातानंतर गाडीचा चालक घटनास्थळावरून फरार झाला असून, पोलिसांकडून त्याचा शोध सुरू आहे.

या दुर्दैवी घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त केली जात असून, संबंधित आरोपीवर कठोर कारवाई करण्याची मागणी ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

## भक्तिमय लीला पुरुषोत्तम श्रीकृष्ण नृत्य नाटिका सादर

■**अकोला,दि. ३१ (प्रतिनिधी):** साधना आराधना संगीत अकॅडमी अकोलाच्या वतीने अकॅडमीच्या ६५ महिला, पुरुष कलाकारांच्या समवेत महानगरात कृष्ण अवतारावर आधारित लीला पुरुषोत्तम श्रीकृष्ण ही भक्तिमय संगीतमय कृष्ण नाटिका मोठ्या भक्तीभावात संपन्न झाली. गरजू रुग्णांसाठी अखंड दृष्टीदान करणाऱ्या सेवाश्रयच्या वतीने मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरासाठी आयोजित स्थानीय प्रमिलाताई ओक हॉल येथे नुकत्याच संपन्न झालेल्या या नाटिकेचे आयोजन साधना आराधना संगीत अकॅडमीच्या संचालिका सौ संतोष माहेश्वरी यांनी तर नृत्य निर्देशिका सौ दीपिका फाफट यांनी ही नाटिका साकार केली. नाटिकेचा प्रारंभ भजनकार अमरचंद जोशी,सौ रेवती जोशी यांच्या हस्ते करण्यात आला.या



संगीतमय नाटिकेत समाजातील ६५ महिला पुरुषांनी भगवान श्रीकृष्ण यांच्या अवतार कार्यातील सुंदर प्रसंग झाकी रूपाने साकारून सभागृहात भक्तिमय वातावरण निर्माण केले.ही नृत्य नाटिका बघण्यासाठी महिला पुरुषांनी सभागृहात एकच गदी केली होती.या नाटिकेचे पार्श्व निवेदन आनंद जहागीरदार व सीमा राठी यांनी केले.प्रास्तविक सेवाश्रयचे विजयकुमार रांदड यांनी करीत सेवाश्रयच्या दृष्टीदान उपक्रमाची माहिती दिली.या उपक्रमातुन संकलित २ लक्ष रुपये हे सेवाश्रयच्या अखंड मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया साठी उपयोगात आणण्यात येणार असल्याचे सांगितले. संचालन सौ रचना चांडक यांनी तर आभार सुरेश माहेश्वरी व विजयकुमार रांदड यांनी मानलेत.यावेळी बहुसंख्य महिला पुरुष उपस्थित होते.

## मृत्यूनंतर पत्नीला माझा चेहरा दाखवू नका

## मृत्यूपत्र लिहित सर्व संपत्ती मुलाच्या नावावर

**अकोला :** मध्यप्रदेशात मुस्कान रस्तोगी नावाच्या एका महिलेने आपल्या पतीची हत्या करून त्याचे तुकडे ड्रममध्ये भरले आणि त्यानंतर आपल्या प्रियकरासोबत पिकनिकला गेली. या घटनेनंतर देशभरात खळबळ उडाली होती. पती-पत्नीमधील प्रेमाच्या नात्यात इतकी कटूता येऊ शकते असा विचारही कोणी करू शकत नाही. दरम्यान अकोला जिल्ह्यातून एक धक्कादायक घटना समोर आली आहे. पतीने स्टेटस ठेवत आपलं आयुष्य संपवलं. धक्कादायक बाब म्हणजे पतीने आपल्या सुसाइड नोटमध्ये मृत्यूनंतर पत्नीला आपला चेहरा दाखवू नका अशी शेवटची इच्छा व्यक्त केली आहे.अकोला जिल्ह्यातील तेल्हारा तहसील कार्यालयाअंतर्गत कार्यरत पटवारी (तलाठी) शिलानंद तेलगोटे यांनी गळफास घेऊन आत्महत्या केली. 'व्हाट्सअप'वर स्टेटस ठेवून तेल्हारा येथील एमआयडीसीमध्ये त्यांनी गळफास घेतल्याची माहिती आहे. पत्नीच्या सततच्या त्रासाला कंटाळून आत्महत्या केल्याचं त्यांनी 'स्टेट्स' मध्ये नमूद केलं आहे. पत्नीकडून आर्थिक आणि मानसिक छळ केल्याचं आरोप त्यांनी आपल्या सुसाइड नोटमध्ये केला आहे. एकेकाळी आपल्या पत्नीसाठी कविता लिहिणाऱ्या शिलानंद यांनी इतकं टोकाचं पाऊल का उचललं असा सवाल उपस्थित होत आहे.त्यांनी स्टेटसमध्ये दिल्यानुसार, पत्नीच्या भावाला शेतीसाठी पैसे हवे होते. यासाठी शिलानंद यांनी स्वत:च्या नावावर कर्ज काढलं होतं.




मात्र प्रत्यक्षात पत्नीच्या भावाने हे हफ्ते फेडण्यास नकार दिला. त्यामुळे पतीला दरमहिना व्यासासह याचे पैसे द्यावे लागत आहे. याशिवाय पत्नीकडून मानसिक त्रास दिला जात असल्याचं त्यांनी सुसाइड नोट मध्ये म्हटलं आहे. पत्नी अश्लील शिवीगाळ करते. गेल्या पाच दिवसांपासून मी जेवण केलं नसल्याचं त्यांनी स्टेटसमध्ये म्हटलं आहे. माझ्या मृत्यूनंतर कोणीही माझा चेहरा पाहिला तरी चालेल पण पत्नीला दाखवू नका, मृत्यूपूर्वीच त्यांनी मृत्यूपत्र लिहित संपूर्ण संपत्ती मुलाच्या नावावर केली आहे. असं त्यांनी स्टेटसमध्ये म्हटलं आहे.शिलानंद यांना एक मुलगा एक मुलगी आहे. फेरफार प्रणाली मध्ये उत्कृष्ट काम केल्या मुळे काही काही वर्षांपूर्वी शिलानंद तेलगोटे यांचे आमदार प्रकाश भारसाकळे यांनी शिलानंदाचा प्रमाणपत्र देऊन सत्कारही केला होता. शिलानंद तेलगोटे अकोट येथील रहिवासी असून तेल्हारा तहसील कार्यालयात कार्यरत होते. १२ मार्च रोजी त्यांच्या लग्नाचा वाढदिवस असतो, चार वर्षांपूर्वी त्यांनी एक फेसबुक पोस्ट करून आपल्या पत्नीसाठी कविताही टाकली होती.

## नापिकी,कर्जाला कंटाळून शेतकऱ्याची आत्महत्या

■**बाळापुर,दि. ३१ (प्रतिनिधी):** सतत होत असलेली नापिकी, त्यामुळे वाढलेला कर्जाचा डोंगर यामुळे वैफल्यग्रस्त झालेल्या शिंगोली येथील ५५ वर्षीय शेतकऱ्याने गावाजवळील शेतातील झाडाला गळफास घेऊन आत्महत्या केली. ही दुर्दैवी घटना बाळापूर तालुक्यातील शिंगाली येथे गुढीपाडव्याच्या दिवशी घडली आहे. दयाराम लक्ष्मण बोर्डे असे आत्महत्या केलेल्या शेतकऱ्याचे नाव असून त्यांच्याजवळ २ एकर शेती आहे. गेली दिवसांपासून सतत होणारी नापिकी व बँकेचे कर्ज यामुळे चिंताग्रस्त अवस्थेत बोर्डे यांनी गावाजवळ असलेल्या शेतातील झाडाला गळफास घेऊन जीवनयात्रा संपविली आहे. दयाराम बोर्डे यांचे पश्चात पत्नी, दोन मुले, मुलगी असा परिवार असून, परिवार पोरका झाला आहे. यापूर्वी राजेश नागोराव बोर्डे या शेतकऱ्याने होळीच्या दिवशी तर दयाराम लक्ष्मण बोर्डे यांनी गुढीपाडव्याच्या दिवशी जीवनयात्रा संपविली.

## आदर्शाचा हिमालय आणि त्यागाचा मेरुपर्वत म्हणजे रामायण : डॉ. भूषण फडके

■**अकोला,दि. ३१ (प्रतिनिधी):** भारतीय संस्कृतीत श्रीरामचंद्र वंदनीय, स्फूर्तीदायक आणि अनुकरणीय आहेत. गुढीपाडव्यापासून श्रीरामचे नवरात्र स्थापन होते. याचेच औचित्य साधून बिर्ला मंदिर जठारपेठ येथे डॉ. भूषण फडके यांच्या संगीत श्रीरामकथा या कार्यक्रमाचे आयोजन निलेश देव मित्र मंडळाने केले आहे. आयुष्यात श्रीरामायण सकारत्माकता शिकवित असे प्रतिपादन डॉ.फडके यांनी केले.

डॉ. फडके पुढे म्हणाले, प्रभू रामाचे चरित्र आदर्शाच्या हिमालयावर आणि त्यागाच्या मेरूपर्वतावर उभे आहे. या चरित्राची व्याप्ती क्षितिजासारखी अमर्याद आहे. भक्तीमार्गाहून मुक्तीमार्गाची ओढ लागलेल्या फक्त वृद्धांसाठी रामायण आहे असा गैरसमज कोणीही करू नये. संस्कारक्षम वयात योग्य संस्कारासाठी, व्यवस्थापनाचे धडे गिरविणाऱ्यांसाठी, सामाजिक ऐक्य एकोपा कसा वृद्धिंगत करावे हे समजण्यासाठी, सर्वांसाठी श्रीरामायण उपयुक्त आहे. आज श्री रामायांतील बालकाण्ड चे निरुपण करण्यात आले. यात वाल्मिकिंकडून रामचरित्र लेखनास प्रारंभ, लव कुशाकडून अयोध्येमध्ये रामचरित्र गायन, अयोध्यानगरीचे वर्णन श्रावण कुमारच्या मातापित्यकडून मिळालेले शाप, पुत्रकामेष्टी यज्ञ, श्रीराम जन्म, त्राटिका वध या घटनांची मांडणी करण्यात आली.वशिष्ठ ऋषींच्या उदाहरणातून सकारत्मकता आणि एखादा शाप वरदान कसा




होऊ शकतो सुंदर निरुपण करण्यात आले. त्रीकालदृष्ट्या महाकवी वाल्मिकी ऋषींनी अनेक जीवनमुल्यांची शिकवण रामायणातून दिली आहे.असे प्रतिपादन डॉ.फडके यांनी केले. त्राटिका वधावर बोलताना डॉ.फडके म्हणाले स्त्री म्हणून या राक्षशिणीस कसे मारावे? असा प्रश्न श्रीरामास पडतो पण ही राक्षशिण नीतिभ्रष्ट आहे. एखाद्या चांगल्या कामात संकटे येतातच त्राटका असेच संकट आहे असे संकट समूळ नष्ट केल्याशिवाय ध्येयापर्यंत पोहचू शकत नाही. राष्ट्ररक्षण हे श्रीरामाचे ध्येय आहे. त्या ध्येयाच्या मार्गात येणाऱ्या अडचणी दूर करणे क्रमप्राप्त आहे म्हणून विश्वामित्र रामास त्राटिकारुपी संकटाला दूर करण्याचा म्हणजेच तिचा वध करण्याची आज्ञा देतात. योग्य मार्गदर्शन करून कार्यपूर्ती कशी करावी याचा योग्य वस्तुपाठ विश्वामित्र ऋषींनी दाखवून दिले आहे. विश्वामित्रतांच्या आदेशानतर श्रीराम त्राटीकेचा वध करतात.

कार्यक्रमात सामोयोचीत गीते सदर करण्यात आली. देवाशिष फडके याने कुश लाव रामायण गाती, राम जन्माला ग सखी,, चला राघवा चला तर निखिल देशमुख यांनी अयोध्या मनुनिर्मित नागरी, दशरथा घे हे पायसदान, जेष्ठ तुझा पुत्र मला देई दशरथा, तर वैशाली फडके यांनी सावळा ग रामचंद्र, तुज मागतो मी आता, रामजन्माचा पाळणा, श्रीराम गजर हि गीते सादर केलीत. हार्दिक दुबे आणि सूमत तरालकर यांनी साथ सांगत केली.रश्मी देव यांनी कलावान्तांचा परिचय करून दिला. तर दिलीप देशपांडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्तविक केले.

### संत गाडगेबाबा विद्यापीठातर्फे

## श्री.ह.भ.प.वासुदेवराव महाराज महल्ले यांचा सत्कार संपन्न

■**अकोला,दि. ३१ (प्रतिनिधी):** श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्थेच्या कार्याची दखल घेऊन श्री संत गाडगे महाराज विद्यापीठ अमरावतीच्या वतीने संस्थेचे अध्यक्ष ह भ प वासुदेवराव महल्ले यांचा शाल श्रीफळ सनमानचिन्ह, सन्मानपत्र देऊन सत्कार सन्मान गौरव करण्यात आला.

या सत्काराला उत्तर देताना ह भ प वासुदेवराव महल्ले पाटील म्हणाले की महाराष्ट्राला लाभलेली संतांची उज्वल परंपरा ही महान असून त्यातील संतद्वय श्री संत गाडगे महाराज व श्री संत वासुदेव महाराज यांचे कार्य सर्व समाजाला प्रेरणादायी असल्याचे मत श्री संत वासुदेव महाराज ज्ञानपीठ संस्था, श्री क्षेत्र श्रद्धासागर, आकोटचे अध्यक्ष श्री.ह.भ.प. वासुदेवराव महाराज महल्ले यांनी व्यक्त केले. स्थानिक संत गाडगेबाबा अमरावती विद्यापीठ, अमरावती येथे आयोजित गरजूंना वस्त्रदान व सत्कार समारंभामध्ये ते बोलत होते. ते पुढे म्हणाले की, श्री संत वासुदेव महाराज उपाध्य श्री ज्ञानेश्वरदास यांनी लिहिलेल्या श्री संत




गाडगेबाबा चरित्रामधील १९ व्या अध्यानुसार सेवाग्राम येथे तत्कालीन मंत्री बाबासाहेब खेर यांनी महात्मा गांधीजी व संत गाडगेबाबा यांच्या भेटीचा योग घडवून आणला.

या ठिकाणी संत गाडगेबाबांचे विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म या अभंगावरील कीर्तन ऐकून महात्मा गांधींना वाटलेले आश्चर्य, तसेच कर्मवीर भाऊराव पाटलांना शासनाकडून अनुदान मिळण्याकरता संत गाडगेबाबांनी केलेले अथक प्रयत्न या दोन प्रसंगांना त्यांनी उजाळा दिला. त्याचबरोबर तीस-पस्तीस वर्षांपूर्वी याच संत गाडगेबाबांच्या अमरावती विद्यापीठामध्ये श्री संत वासुदेव महाराजांचा भव्य उद्बोधन कार्यक्रम पार पडला. या आठवणींना श्री महल्ले महाराजांनी प्रामुख्याने उजाळा दिला.

## पोटच्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार बापाला सश्रम कारावास

■**अकोला,दि. ३१ (प्रतिनिधी):** आपल्या पोटच्या मुलीवर लैंगिक अत्याचार करणाऱ्या नराधम बापाला न्यायालयाने वीस वर्ष सश्रम करावासाची शिक्षा कोठवली आहे मूर्तिजापूर तालुक्यात घडलेली ही घटना होय मुलीची आई ही पतीसोबत पटत नसल्यामुळे विभक्त राहत होती काही दिवसानंतर हा नराधम बाप देखील मुलांना घेऊन मुर्तीजापुर येथे आला त्या ठिकाणी संधी साधून त्याने आपल्या अल्पवयीन मुलीवर अत्याचार केला या प्रकरणी पीडित करण्याने दिलेल्या तक्रारीवरून त्याच्याविरुद्ध बलात्कार व पॉक्सो कलमाखाली गुन्हा दाखल करून त्याला अटक केली होती त्याचे विरुद्ध न्यायालयात आरोप पत्र दाखल करण्यात आले होते अकोला येथील न्यायालयात चाललेल्या या खटल्यात एकूण



सहा साक्षीदार तपासण्यात आले सर्व साक्षीदार आपल्या साक्षीवर थांब राहिले उभय पक्षाचे म्हणणे ऐकून घेऊन समोर आलेले साक्षी पुरावे बघता न्यायालयाने बापाला ३७६ / ३ अंतर्गत जोशी ठरवत वीस वर्ष सश्रम कारावास तसेच दहा हजार रुपये दंड दंड न भरल्यास सहा महिने अतिरिक्त करावास ५०६ कलमाखाली तीन महिने का रवास अशी शिक्षा फ्रोटो ठेवली आहे सदर खटल्यामध्ये सरकार पक्षाची बाजू सहाय्यक सरकारी वकील शाम खोटरे यांनी जोरकसपणे मांडले

## थोडक्यात

### आयुष्य समुद्रासारखं जगा :प्रा.विजयसिंहजी गहिलोत



**पातूर :** येथील बेरार एज्युकेशन सोसायटी, पातुर व्यवस्थापक तथा माजी प्राचार्य विजयसिंहजी ६७व्या गहिलोत यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने स्थानिक तुळसाबाई कावल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पातुर येथे त्यांचा सहृदय सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. या कार्यक्रमाला शिक्षण क्षेत्रातील अनेक मान्यवर उपस्थित होते. यावेळी प्राचार्य विजयसिंहजी गहिलोत यांनी उपस्थितांना मार्गदर्शन करताना सांगितले की, 'मानवी आयुष्य हे अनमोल आहे. समुद्र जसा अथांग असतो आणि सर्वांना जगवण्याचं सामर्थ्य त्यात असतं, त्याचप्रमाणे आपले आयुष्य दुसऱ्यांच्या उपयोगी पडले पाहिजे. चांगला विचार करा, चांगले आचारण ठेवा, उच्चारही चांगला असावा आणि चांगले कार्य करा. आपले आयुष्य सार्थकी लागल्याशिवाय राहणार नाही.' त्यांच्या प्रेरणादायी विचारांनी उपस्थित श्रोत्यांना जीवनाविषयी नवा दृष्टिकोन दिला. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी बेरार एज्युकेशन सोसायटीच्या सचिव स्नेहप्रभादेवी गहिलोत होत्या. प्रमुख पाहुणे म्हणून प्राचार्य तथा मुख्याध्यापक अंशुमानसिंह गहिलोत, उपप्राचार्य एस. बी. चव्हाण, मदर इंडिया कॉन्व्हेंटचे मुख्याध्यापक महेंद्र खंडारे, उपमुख्याध्यापिका रश्मी ढेंगे, पर्यवेक्षिका प्रीती कारस्कर, पर्यवेक्षक एस. आर. मुखाडे यांची उपस्थिती होती. या सोहळ्यात मदर इंडिया कॉन्व्हेंट, पातुर, तुळसाबाई कावल माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालय, पातुर व बाभूळगाव तसेच सरलाबाई गहिलोत कनिष्ठ महाविद्यालय, बाभूळगाव येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांनी प्राचार्य विजयसिंहजी गहिलोत सर यांच्या शैक्षणिक योगदानाबद्दल गौरवोद्गार काढले आणि त्यांना पुढील आयुष्यासाठी शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सर्व कर्मचारी शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक एस. बी. ठाकरे यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन स्वप्निल डोंगरे यांनी उत्तमरित्या पार पाडले, तर एनसीसी ऑफिसर सुभाष इंगळे यांनी उपस्थितांचे आभार मानले. हा कार्यक्रम अत्यंत उत्साहात पार पडला आणि उपस्थित सर्वांना प्रेरणादायी ठरला. प्राचार्य विजयसिंहजी गहिलोत यांचे शैक्षणिक क्षेत्रातील योगदान कायम स्मरणात राहील, असे उपस्थित मान्यवरांनी सांगितले.

### १५ व्या औद्योगिक व व्यावसायिक कामगार नाट्य स्पर्धेत

## महावितरण अकोला परिमंडळाचे 'सिकॅरियस' नाटक राज्यात प्रथम

### सांघिक विजेतेपदासह नाट्य संघाला मिळाली एकूण सहा बक्षिसे



■**अकोला,दि ३१ (प्रतिनिधी):** कामगार कल्याण मंडळाच्या १५ व्या औद्योगिक व व्यावसायिक कामगार नाट्य स्पर्धेतस महावितरण अकोला परिमंडळाअंतर्गत बुलढाणा येथील महावितरण कंपनीच्या नाट्य संघाने सादर केलेले सिकॅरियस हे नाटक एकूण सहा बक्षिसांसह राज्यातून प्रथम आले आहे.

मुंबई येथील विक्रोळीच्या स्वातंत्र्यवीर सावरकर नाट्यगृहात ३ मार्चपासून स्पर्धेला प्रारंभ झाला होता. राज्यातील विविध शासकीय निमशासकीय तसेच शासनमान्य व शासन स्वीकृत कंपनी आस्थापनांमधील एकूण २० नाट्यसंघांनी या स्पर्धेत सहभाग नोंदवला होता. येथील महावितरण कंपनीच्या नाट्य संघाने कामगार कल्याण केंद्र बुलढाणातर्फे १८ मार्च रोजी डॉ. चंद्रकांत शिंदे लिखित व दिग्दर्शित सिकॅरियस या दोन अंकी रहस्यमय नाटकाचे सादरीकरण केले होते. २५ मार्च रोजी जाहिर झालेल्या निकालात महावितरण बुलढाणाचे नाटक संपूर्ण राज्यातून प्रथम आले. नाटकाला एकूण ६ बक्षिसे प्राप्त झाली. यामध्ये निर्मितीसाठी महावितरणच्या संचालन व सुव्यवस्था मंडल बुलढाणाला प्रथम क्रमांक, दिग्दर्शनासाठी डॉ. चंद्रकांत शिंदे यांना प्रथम क्रमांक, पार्श्वसंगीतासाठी योगेश सोनुने यांना प्रथम क्रमांक, प्रकाश योजनेसाठी डॉ. चंद्रकांत शिंदे यांना प्रथम क्रमांक, पुरुष गटातील अभिनयासाठी गणेश राणे यांना द्वितीय क्रमांक व पुरुष गटातील अभिनयासाठी संतोष पाटील यांच्या उत्तेजनार्थ बक्षिसाचा समावेश आहे. नाटकाचे निर्माता बुलढाणा महावितरण मंडळाचे अधीक्षक अभियंता सुरेंद्र कटके हे होते तर सहनिर्माते कार्यकारी अभियंता बी. यु. जायभाये हे होते. नाटकाचे व्यवस्थापन अकोला परीमंडळाचे उपमुख्य औद्योगिक संबंध अधिकारी अरुण शेलकर, कार्यकारी अभियंता मंगलसिंग चव्हाण व मानव संसाधन विभागाच्या व्यवस्थापिका सौ. पौर्णिमा कदम यांनी केले.

विवेकानंद वाघ व रवींद्र गिरी यांनी रंगमंच व्यवस्थापन केले.

RNINO-46973/1986 महासागर अकोला मालक,मुद्रक,प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरुणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर१-८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, कमला स्केअर, दुर्गा चौक,अकोला येथे प्रकाशित केले. संपादक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक मुख्य कार्यालय फोन ७४४७७३५८५१,९९२२९७००२३+स्थानिक संपादक पुरुषोत्तम डोले फोन ९८८१४८१४७९+(पी.आर.बी.कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांचेवर राहील.)

# निरामय

# 'ब्रेन स्ट्रोक'मुळे होऊ शकतात एक कोटी मृत्यू!



**बेलापूरः महिला वर्गात आढळणारी स्ट्रोकची समस्या संप्रेरकांमधील बदल आणि जीवनशैलीमुळे उत्पन्न होते. या संबंधीचे जोखीम घटक जाणून घेतल्यास प्रतिबंध आणि वेळीच उपचारास मदत होते. 'इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रिसर्च' (आयसीएमआर) ने केलेल्या अभ्यासात आढळून आले आहे, की २०५० पर्यंत भारतासह कमी आणि मध्यम उत्पन्न असणाऱ्या देशांमध्ये 'ब्रेन स्ट्रोक'मुळे एक कोटी मृत्यू होऊ शकतात.**

डॉ. रवींद्र सोमाणी

'आयसीएमआर' च्या २०२१ मधील आकडेवारीवरून दिसून आले आहे की, स्ट्रोक हे मृत्यूचे तिसरे प्रमुख कारण आहे तर भारतात अपंगत्वाचे सहावे प्रमुख कारण ठरत आहे. हे आकडे चिंताजनक असून निश्चितच वेळीच लक्ष देण्याची गरज आहे.

- **स्ट्रोक का होतो?**
  मेंदूचा रक्तपुरवठा विस्कळीत झाल्यावर स्ट्रोक होतो. त्यामुळे तेथील पेशींचे नुकसान होते. रक्तवाहिनी ब्लॉक झाल्यामुळे (इस्केमिक स्ट्रोक) किंवा रक्तवाहिनी फुटून रक्तस्राव झाल्याने (हेमरेजिक स्ट्रोक) ब्रेन स्ट्रोक होऊ शकतो. ऑक्सिजन आणि पोषक तत्त्वांअभावी मेंदूच्या पेशी मृत पावतात. त्यामुळे कायमस्वरुपीचे नुकसान होते किंवा मृत्यूदेखील होतो.
- **लक्षणे**
  अस्पष्ट बोलणे, तोल जाणे, अचानक भुरकट दिसणे, एका बाजूचे तोंड वाकडे होणे, एक हात निष्क्रिय होणे, स्पष्ट बोलता न येणे ही स्ट्रोकची लक्षणे आहेत. माहितीचा अभाव किंवा गैरसमजुतींमुळे लोकांना स्ट्रोक विषयी फारशी माहिती नसते. लक्षणे कमी दिसत असल्यास लोक उपचाराची आवश्यकता नसल्याचे गृहीत धरतात. परंतु स्ट्रोक व्यवस्थापनासाठी त्वरित वैद्यकीय मदत घेणे ही काळाची गरज आहे, हे आता लक्षात घ्यायला हवे.
- **महिलांमधील स्ट्रोकला कारणीभूत घटक**
  उच्च इस्ट्रोजेन पातळी असणाऱ्या महिलांमध्ये गर्भनिरोधक गोळ्यांचा वापर रक्ताच्या गुठळ्या होण्यास कारणीभूत ठरतो. त्यामुळे स्ट्रोकची शक्यता वाढते. खेरीज मायग्रेन ही महिलांमध्ये एक सामान्य स्थिती असते. त्याचबरोबर धूम्रपान हेदेखील स्ट्रोकचे कारण आहे. हे घटक महिलांमध्ये आयुष्याच्या विविध टप्प्यांवर स्ट्रोकची शक्यता निर्माण करतात.
- **काय कराल?**
  हा धोका टाळण्यासाठी निरोगी जीवनशैली राखा. आरोग्य स्थिती व्यवस्थापित करणे आणि संप्रेरकांमधील बदलांचे निरीक्षण करणे महिलांमध्ये स्ट्रोक टाळण्यास मदत करू शकते.
- **कारणीभूत घटक कोणते?**
  **रजोनिवृत्तीनंतर हार्मोनल बदल :**
  रजोनिवृत्तीनंतर कमी होणारी इस्ट्रोजेन पातळी हृदय आणि रक्तवाहिन्यांना प्रभावित करते. त्यामुळे स्ट्रोकचा धोका वाढतो. अनेकदा महिलांना रजोनिवृत्तीनंतर उच्च रक्तदाबाचा त्रास होतो. हादेखील स्ट्रोकसाठी एक जोखीम घटक आहे.
- गर्भधारणेशी संबंधित बदल : प्रीक्लेम्पसिया (उच्च रक्तदाब) आणि गर्भावस्थेतील मधुमेह स्ट्रोकला कारणीभूत ठरतात. या रुग्णांना तातडीने औषधोपचारांची आवश्यकता भासते.
- उच्च रक्तदाब: हे वयस्कर महिलांमध्ये स्ट्रोकला कारणीभूत घटकांपैकी एक प्रमुख कारण ठरते आहे. मात्र नियमित तपासणी, व्यायाम आणि औषधे घेऊन त्याचे व्यवस्थापन करण्यास मदत होते.
- हृदयाचे अनियमित ठोके : वृद्ध महिलांमध्ये ही एक सामान्य घटना आहे. त्यामुळे रक्ताच्या गुठळ्या होऊन स्ट्रोकचा धोका वाढू शकतो. स्ट्रोक रोखण्यासाठी औषधांसह योग्य उपचार आवश्यक आहेत.
- धूम्रपान : धूम्रपानाची सवय रक्तवाहिन्यांवर परिणाम करते. यामुळे रक्ताच्या गुठळ्या वाढतात आणि स्ट्रोकचा धोकाही वाढतो. धूम्रपान सोडल्याने स्ट्रोकचा धोका टाळता येतो.
- लठ्ठपणा आणि व्यायामाचा अभावः ही बाब रक्तदाब, मधुमेह आणि कोलेस्टेरॉल वाढवू शकते. यामुळे स्ट्रोकची शक्यताही वाढते. हा धोका टाळण्यासाठी दररोज व्यायाम करा. त्याचबरोबर वजन नियंत्रित राखणे, पौष्टिक आहाराचे सेवन, वेळोवेळी रक्तदाब, साखर आणि कोलेस्टेरॉल पातळी तपासणे आणि तज्ज्ञांच्या मदतीने त्यांचे व्यवस्थापन करणे गरजेचे आहे.
- मद्यपान : अति प्रमाणात मद्यपान केल्याने रक्तदाब आणि वजन वाढते. त्यामुळे स्ट्रोकचा धोका वाढतो. म्हणूनच स्ट्रोक रोखण्यासाठी अल्कोहोलचे सेवन मर्यादित करणे गरजेचे आहे.

# अल्झायमरविषयी...



व्याधी विचार

अल्झायमर म्हणजे विस्मरण. या व्याधीबाबत बरेच गैरसमज आहेत. तसंच यासंबंधी फारशी जागरूकताही नाही. मुळात अल्झायमर समजून घेणं गरजेचं आहे. अल्झायमर हा डिमेन्शियाचा सर्वसाधारणपणे आढळणारा प्रकार आहे. यात मेंदूतल्या पेशी हळूहळू नष्ट होत जातात. आजघडीला भारतात अल्झायमरचे चार दशलक्ष रुग्ण आहेत. २०३० पर्यंत ही संख्या दुपटीने वाढण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. अल्झायमरच्या रुग्णांना विस्मरण होऊ लागतं. यामुळे त्यांच्या दैनंदिन व्यवहारांवर परिणाम होतो. मात्र या व्याधीबाबत काही गैरसमजही प्रचलित आहेत. हे गैरसमज दूर करणं गरजेचं आहे.

अल्झायमरचं निदान झालं की सगळं काही संपलं, असा सर्वसाधारण समज आहे. मात्र या विकाराचं निदान झाल्यानंतरही रुग्ण पुढची बरीच वर्षं निरोगी आयुष्य जगू शकतो. काही प्रसंगी औषधांमुळे या विकाराच्या लक्षणांवर नियंत्रण मिळवता येतं. यासोबतच पोषक आहार घेणं, लोकांमध्ये मिसळणं, मेंदूला चालना देणाऱ्या गोष्टी करणं, व्यायाम करणं, शारीरिक हालचाल करणं यामुळे ही व्याधी बळावण्याची प्रक्रिया मंदावते.

सत्तरीच्या पुढे अल्झमायर होतो असाही एक समज आहे. पण जीवनशैलीतले बदल, आहाराच्या चुकीच्या सवयी अशा कारणांमुळे तिशीतही हा विकार जडू लागला आहे. अल्झायमर कोणत्याही वयाच्या आणि लिंगाच्या व्यक्तीला होऊ शकतो. बैठी जीवनशैली आणि ताण या बाबी अल्झायमरला कारणीभूत ठरतात.

ज्येष्ठांना विस्मरण होतंच असंही अनेकांना वाटतं. ही अत्यंत सर्वसाधारण बाब मानली जाते. एखाद्या प्रसंगी विस्मरण होणं समजू शकतं. पण सातत्याने गोष्टी विसरल्या जात असतील तर हे अल्झायमरचं लक्षणं असू शकतं. विस्मरण इतर काही विकारांचं लक्षण असू शकतं. लक्षणांचं वेळेत निदान झालं तर विस्मरणाचा धोका टळू शकतो.

अल्झायमर हा अनुवंशिक आजार असल्याचाही समज आहे. अनुवंशिक कारणांमुळे डिमेन्शिया होऊ शकतो. पण याचं प्रमाण बरंच कमी आहे. अल्झायमरचं जनुक पालकांकडून मुलांकडे जाऊ शकतं. त्यामुळे पालकांना अल्झायमर असेल तर मुलांनाही जडू शकतो. पण अल्झायमर झालेल्या पालकांच्या मुलांना ही व्याधी जडेलच असं नाही.

# महिलांमध्ये मानसिक विकार अधिक



**आजच्या काळात मानसिक अनारोग्य ही एक मोठी समस्या बनली आहे. 'नॅशनल क्राईम रेकॉर्ड ब्यूरो' (एनसीआरबी) नुसार, भारतात आत्महत्या करणाऱ्यांपैकी ३६.६ टक्के महिला असून त्यापैकी सर्वाधिक १८ ते ३९ वर्षे वयोगटातील आहेत. असे असतानाही मानसिक आरोग्याबाबत समाजात भीती वा अज्ञान असून आपल्याला वेडे ठरवले जाण्याच्या भीतीने अनेक महिला उपचार घेणे टाळत आहेत.**

डॉ. मेघा दळे

'एम्पॉवर'च्या सर्वेक्षणात दिसून आले आहे की, महिला मानसिक आरोग्याच्या समस्यांबद्दल उघडपणे बोलण्यासही घाबरतात. याशिवाय लैंगिक छळ, कौटुंबिक हिंसाचार आणि काम आणि जीवनाचा असमतोल यामुळे महिलांचे मानसिक आरोग्यही बिघडत आहे.

- काय सांगतो अहवाल?
  'आदित्य बिर्ला एज्युकेशन ट्रस्ट' च्या 'एमपॉवर' संस्थेने 'अनवेलिंग, द सायलेंट स्ट्रगल' नावाचा अहवाल प्रसिद्ध केला. हा अहवाल देशभरातील १३ लाख महिलांच्या मानसिक आरोग्य डेटावर आधारित आहे. त्यात महाविद्यालयीन विद्यार्थी, कॉर्पोरेट व्यावसायिक, ग्रामीण महिला आणि सैन्यात सेवा करणाऱ्या महिलांच्या मानसिक आव्हानांबद्दल उल्लेख आहे. महिलांचे मानसिक आरोग्य बिघडण्याची अनेक कारणे आहेत.
- वाढता तणाव
  ५० टक्के स्त्रिया काम आणि जीवन संतुलन, आर्थिक दबाव आणि सामाजिक अपेक्षांमुळे तणावाखाली असतात. ४७ टक्के महिलांना निद्रानाशाची समस्या असते. विशेषत: १८–३५ वयोगटातील महिलांना झोपेच्या समस्येचा सामना करावा लागतो. ४१ टक्के महिलांना भावनिकदृष्ट्या एकटेपणा जाणवतो. ३८ टक्के विद्यार्थिनी आणि नोकरदार महिला करिअरच्या वाढीबद्दल आणि आर्थिक स्थिरतेबद्दल चिंतित आहेत.
- कॉर्पोरेट जगात कार्यरत महिला
  सर्वेक्षणात ४२ टक्के महिलांमध्ये नैराश्य आणि चिंतेची लक्षणे आढळून आली. ८० टक्के महिलांना प्रसूती रजा आणि करिअरच्या वाढीमध्ये भेदभावाचा सामना करावा लागतो. ९० टक्के स्त्रिया म्हणतात, की मानसिक आरोग्य समस्या त्यांच्या कामावर परिणाम करतात.
- ग्रामीण महिलांचे मानसिक आरोग्य
  महाराष्ट्र सरकारबरोबरच्या प्रकल्प संवादाअंतर्गत १२.८ लाख ग्रामीण महिलांच्या सर्वेक्षणात दिसून आले आहे, की आर्थिक अस्थिरता, सामाजिक कलंक आणि मानसिक आरोग्य सेवांच्या अभावामुळे त्या गंभीर नैराश्य आणि चिंतेने ग्रस्त आहेत.
- कार्पोरेट बर्नआऊट
  मुंबईमध्ये शैक्षणिक ताण आणि कॉर्पोरेट बर्नआउट सर्वाधिक आहे. दिल्लीत सुरक्षेची चिंता आणि छळामुळे उद्‌भवणाऱ्या चिंतेची समस्या जास्त आहे. कोलकात्यात भक्कम सोशल नेटवर्क असूनही महिला मानसिक आरोग्यसेवेपासून दूर आहेत.
- हा आजार औषधांनी बरा होऊ शकतो?
  नैराश्य, चिंता, निद्रानाश, व्यक्तिमत्त्व विकार, नातेसंबंधातील आव्हाने आणि वैवाहिक कलह हेदेखील महिलांसाठी एक गंभीर आव्हान असते. पण व्यक्तीच्या गरजेनुसार औषधोपचार, मानसोपचार किंवा दोन्हीच्या संयोजनाने मनोविकारांवर प्रभावीपणे नियंत्रण करता येते.
- **चांगली झोप आणि योगासनेही महत्त्वाची**
  तणावाच्या बळी ठरू नये यासाठी महिलांना योगा, नियमित शारीरिक हालचाली, ध्यान, संतुलित आहार, दर्जेदार झोप आणि मजबूत सामाजिक आधाराची गरज असते. याशिवाय तणाव, नैराश्य आणि चिंताग्रस्त समस्या असणाऱ्या महिलांनी वेळोवेळी मानसोपचार तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा.

# मधुमेह औषध कर्करोगावर गुणकारी

अहिल्यानगरः कर्करोगाच्या रुग्णांमध्ये हृदय फेल्युअर ही एक सामान्य समस्या बनत आहे. बहुतेक कर्करोग रुग्णांना रुग्णालयात दाखल केले जाते. आता एका नवीन अभ्यासातून दिसून आले आहे की मधुमेहाचे एसजीएलटी २ हे विशेष औषध इनहिबिटर कर्करोगाच्या रूग्णांमध्ये हृदय फेल्युअरचा धोका ५० टक्के कमी करू शकते आणि उपचारानंतर त्यांची स्थितीही सुधारू शकते.

डॉ. सतीश सोनवणे

- कर्करोगाच्या उपचारात दिल्या जाणाऱ्या केमोथेरपीचा शरीरावर खोलवर परिणाम होतो. कर्करोगाच्या पेशी नष्ट करण्यासोबतच त्याचा हृदयावरही नकारात्मक परिणाम होऊ शकतो. त्यामुळे हृदय फेल्युअरचा धोका वाढतो. संशोधनानुसार, केमोथेरपीनंतर २० टक्के कर्करोगाच्या रुग्णांमध्ये हृदयविकार दिसून येतो. त्यापैकी दहा टक्के रुग्णांमध्ये हृदयक्रिया बंद पडू शकते. परंतु नवीन संशोधनात समोर आले आहे की, मधुमेही रुग्णाला कर्करोग झाला असेल आणि मधुमेहाचे हे खास औषध घेत असेल तर हृदय फेल्युअरचा धोका ५० टक्क्यांनी कमी होऊ शकतो.
- **नव्या अभ्यासात गौप्यस्फोट**
  ब्रिटनच्या ईस्ट अँग्लिया विद्यापीठातील संशोधकांनी या विषयावर सविस्तर अभ्यास केला. यामध्ये मधुमेहावरील विशेष औषध एसजीएलटी २ इनहिबिटर हे हृदयविकार रोखण्यासाठी प्रभावी असल्याचे आढळून आले. हा अभ्यास 'युरोपीयन जर्नल ऑफ प्रिव्हेंटिव्ह कार्डिओलॉजी'मध्ये प्रकाशित झाला आहे.
- **औषध कशी मदत करते?**
  संशोधकांनी ८८,२७३ कर्करोग रुग्णांच्या १३ अभ्यासांचे विश्लेषण केले. त्यात दिसून आले की, हार्टअ‍ॅटॅकमुळे रुग्णालयात दाखल होण्याची शक्यता ५० टक्के कमी झाली आहे. हार्टअ‍ॅटॅकच्या नवीन प्रकरणांमध्येही ७१ टक्क्यांपर्यंत घट दिसून आली. हे औषध स्तनाच्या कर्करोगाच्या रुग्णांसाठी फायदेशीर असल्याचे दिसून आले कारण अँथ्रासाइक्लिन केमोथेरपीमुळे त्यांचे हृदय कमकुवत होऊ शकते.
- **तज्ज्ञांचे मत**
  या अभ्यासाचे प्रमुख संशोधक प्रोफेसर वासिलिऊ वॅसिलिओ यांच्या मते, एसजीएलटी२ इनहिबिटर औषधे हृदयविकारांवर आधीच उपयुक्त ठरली आहेत. ती श्वास लागणे, थकवा यासारख्या हृदरोगाशी संबंधीत समस्या कमी करू शकतात तसेच रुग्णांना निरोगी वाटू शकते.
- **सखोल संशोधनाची गरज आहे**
  हे परिणाम आशादायक असले तरी संशोधकांचे म्हणणे आहे की, यावर अधिक सखोल अभ्यास आवश्यक आहे. कारण त्यानंतरच हे औषध कर्करोगाच्या रूग्णांसाठी मोठ्या प्रमाणावर वापरले जावू शकते.



# बैठे काम देते आजारांना निमंत्रण

सध्याच्या जीवनशैलीत तासनतास बसून काम करणे सामान्य झाले आहे. ऑफिस असो किंवा घर; लोक लॅपटॉप आणि मोबाईल वापरून सलग सहा ते आठ तास बसतात. परंतु जास्त वेळ बसून राहणे शरीरासाठी धोकादायक आहे. संशोधनात दिसून आले आहे, की दररोज सहा तासांपेक्षा जास्त वेळ बसणाऱ्या लोकांना लठ्ठपणा, हृदयरोग आणि मधुमेह यासारख्या आजारांचा धोका वाढतो.

डॉ.अजिंक्य बोऱ्हाडे

- वजन वाढण्याचा धोका
  तासनतास एकाच जागी बसून राहिल्यास शरीरातील उष्मांक जळण्याची प्रक्रिया मंदावते. त्यामुळे पोट आणि कंबरेभोवती चरबी जमा होऊ लागते आणि वजन झपाट्याने वाढते.
- हृदयरोगाचा धोका
  संशोधनात दिसून आले आहे, की जास्त वेळ बसल्याने हृदयविकाराचा धोका जवळपास ३० टक्क्याने वाढू शकतो. सतत बसल्याने शरीरातील रक्ताभिसरण मंदावते आणि कोलेस्ट्रॉल वाढते. यामुळे हृदयविकाराचा धोकाही वाढतो.
- मधुमेहाचा धोका वाढतो
  जास्त वेळ एका जागी बसून काम करणाऱ्या लोकांची चयापचय क्रिया मंदावते. यामुळे शरीराची इन्सुलिनला प्रतिसाद देण्याची क्षमता कमी होते आणि रक्तातील साखरेची पातळी वाढते. त्यामुळे टाइप-२ मधुमेह होण्याची शक्यता वाढते.

पाठ आणि मान दुखणे
एकाच जागी बराच काळ बसल्याने पाठीच्या कण्यावर दबाव वाढतो. त्यामुळे पाठदुखी वाढते तसेच मान ताठ होऊ शकते. जास्त वेळ चुकीच्या स्थितीत बसल्याने मणक्याचा त्रास होऊ शकतो.

मानसिक आरोग्यावर परिणाम
सतत बसणे आणि शारीरिक हालचालींचा अभाव यामुळे मेंदूला रक्तपुरवठा कमी होतो. त्यामुळे तणाव, चिंता आणि नैराश्याच्या समस्या वाढू शकतात.

- हे धोके टाळण्यासाठी उपाय
  - दर ३०–४० मिनिटांनी ब्रेक घ्या.
  - दोन–तीन मिनिटे चाला किंवा हलके स्ट्रेचिंग व्यायाम करा.
  - वर्कस्टेशन बदला. उभे राहून काम करण्याचा प्रयत्न करा.
  - शारीरिक हालचाली वाढवा.
  - ऑफिस किंवा घरात चालताना लिफ्टचा वापर करण्याऐवजी पायऱ्या वापरा. व्यायामाची सवय ठेवा. दररोज किमान ३० मिनिटे चाला किंवा योगासने करा.



नवसंशोधन

## अपुऱ्या झोपेमुळे वाढतं वजन

वजन वाढण्याची बरीच कारणं असतात. त्यापैकी एक कारण म्हणजे अपुरी झोप.



त्यातही अपुऱ्या झोपेमुळे तरुण मुलींचं वजन वाढू शकतं, ही बाब एका संशोधनातून समोर आली आहे. रात्री लवकर झोपणाऱ्या मुलींच्या तुलनेत उशिरा झोपणाऱ्या मुलींचं वजन लवकर वाढतं, असं संशोधन सांगतं. वजनवाढ आणि झोपेचा संबंध खूप आधीपासूनच जोडण्यात आला आहे. मात्र या संशोधनाने त्याला दुजोरा मिळाला आहे. या संशोधनासाठी ११ ते १६ या वयोगटातल्या ८०४ मुलामुलींचा अभ्यास करण्यात आला. त्यात ४१८ मुली आणि ३८६ मुलांचा समावेश होता. या मुलांना झोपेशी संबंधित प्रश्न विचारण्यात आले. तसंच त्यांच्या मनगटावर अ‍ॅक्टीग्राफही बांधण्यात आला होता.

## आरोग्य तपासणीआधी आपल्याकडून होणाऱ्या चुकांविषयी

रक्तदाबाची तपासणी करण्याच्या किमान तासभर आधी कॉफी किंवा कार्बनयुक्त पेयं पिऊ नयेत. कोणत्याही कॅफेनयुक्त पेयाचा आपल्या रक्तदाबावर परिणाम होत असल्याने रक्तदाब कृत्रिमरित्या वाढतो. डॉक्टरांकडे जाण्याआधी औषधं घेऊ नका. औषधांच्या परिणामांमुळे आजाराची लक्षणं दबली जाऊन डॉक्टरांना योग्य निदान करता येत नाही. त्वचातज्ज्ञांकडे जाताना नखांना नेलपॉलिश लावू नका. नखांच्या रंगावरून बऱ्याच विकारांचं निदान करता येतं. तसंच मेक अपही करू नका. कोलेस्टरॉल चाचणीआधी मद्यपान केल्यास ट्रायग्लिसराइड्सच्या संख्येवर परिणाम होऊ शकतो. कोलेस्टरॉल चाचणी करण्याच्या २४ तास आधी मद्यपान करू नये. यासोबत गोड, तेलकट पदार्थांचं सेवन करू नये. अतिखाणं टाळावं.



# मधुमेहाचा त्वचेला फटका

श्रीरामपूरः मधुमेह हा केवळ रक्तातील साखर वाढण्याचा आजार नाही तर त्याचा परिणाम शरीराच्या अनेक भागांवरही होतो. विशेषतः त्वचेला याचा जास्त फटका बसतो. सामान्य लोकांपेक्षा मधुमेहाच्या रुग्णांना त्वचेच्या संसर्गाचा धोका जास्त असतो. मधुमेहामुळे होणारी शरीराची कमकुवत प्रतिकारशक्ती आणि उच्च रक्तातील साखरेमुळे बॅक्टेरिया आणि बुरशीची जलद वाढ हे यामागील कारण असू शकते. म्हणूनच वेळीच लक्ष न दिल्यास किरकोळ वाटणारा संसर्गही गंभीर रूप घेऊ शकतो.

डॉ. दिलीप शिरसाठ

रक्तातील साखरेचे प्रमाण जास्त असल्याने बॅक्टेरिया लवकर वाढतात. त्यामुळे जखम लवकर बरी होत नाही. त्यामुळे संसर्ग वाढतो. याशिवाय कमकुवत रोगप्रतिकारक शक्तीमुळे शरीर संसर्गाशी लढण्यात कमी पडते. कोरड्या त्वचेमुळे खाज येते. तिथून जीवाणू शरीरात प्रवेश करू शकतात. * बुरशीजन्य संसर्ग: मधुमेहामध्ये कॅन्डिडा बुरशीची वाढ झपाट्याने होते. त्यामुळे खाज सुटणे, लाल पुरळ येणे आणि जळजळ हा त्रास होऊ शकतो.



* बॅक्टेरियल इन्फेक्शन: फोड येणे, केसांच्या मुळांशी जळजळ होणे (फॉलिक्युलायटिस) आणि सेल्युलायटिस यासारख्या समस्या उद्भवू शकतात. * डायबेटिक डर्मोपॅथी: यामध्ये त्वचेवर तपकिरी-लालसर रंगाचे डाग पडतात. ते हळूहळू गडद होतात.

* लिथिओसिसः या स्थितीत त्वचा खूप कोरडी होते आणि वर पांढरा थर जमा होऊ लागतो.

प्रतिबंधासाठी सल्ला – हा त्रास टाळण्यासाठी रक्तातील साखर नियंत्रणात ठेवा. सकस आहार आणि व्यायाम हा दिनचर्येचा भाग बनवा. त्वचा स्वच्छ आणि कोरडी ठेवा. दररोज आंघोळ करा. अँटीसेप्टिक साबण वापरा आणि त्वचेत ओलावा राखा. लहान जखमांकडे दुर्लक्ष करू नका. ताबडतोब अँटीसेप्टिक क्रीम लावा आणि आवश्यक असल्यास डॉक्टरांचा सल्ला घ्या. आरामदायक कपडे घाला. सिंथेटिक कपड्यांऐवजी सुती कपडे घाला कारण याने घाम लवकर सुकतो. त्वचेवर कोणताही असामान्य बदल दिसल्यास ताबडतोब डॉक्टरांचा सल्ला घ्या.

## गुणकारी हरड



पचनसंस्थेच्या तक्रारींवर आयुर्वेदिक उपचार उपयोगी पडतात. हरड हा घटकामुळे पचनशक्ती सुधारते. अनेकांना बद्धकोष्ठतेचा त्रास असतो. या व्याधीला वात कारणीभूत ठरतो. यासोबत फायबरचा अभाव आणि पाण्याचं कमी प्रमाणही बद्धकोष्ठता वाढवतं. पण हरडीच्या नियमित सेवनामुळे हा त्रास कमी होऊ शकतो. पोटफुगी, पोटदुखी या समस्याही दूर होतात. त्रिफळाला पर्याय म्हणूनही हरडीचा वापर केला जातो. हरडीमुळे रोगप्रतिकारक शक्ती वाढते. वय वाढण्याची प्रक्रिया मंदावते. यासोबतच आवाज बसणं, टीबी तसंच अस्थमावरही हरड प्रभावी आहे. हरडीच्या सेवनाने पचनसंस्था स्वच्छ होते. यामुळे पचनसंस्थेचं कार्यही सुधारतं.

